"नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास"
दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका

कार्यालय फोन : २३८७७३०१, २३८८००७३
WEB SITE : http://www.nkgsbsangh.org
E-MAIL : nkgsbs@gmail.com
कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)

।। इष्टं धर्मेण योजयेत्।।

मूल्य रु. ५

क्रमांक १ वर्ष : ३९ एप्रिल-जून २०१९

**BOOK POST**

**TO,**

**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.

## ठाणे मंच आयोजित
## ज्येष्ठ नागरिकांसाठी दोन दिवसांचे शिबिर

तारीख : ११ ते १२ एप्रिल २०१९ (२ दिवस १ रात्र)

स्थळ : शांतशिल रिसोर्ट, माहीम-केळवे बीच रोड, पालघर
(दादरपासून ३॥ ते ४ तासांचा प्रवास)

आकार : प्रत्येकी ४००० (डबल रुम) प्रत्येकी रु ३००० (डोरमेटरी ६ जणांसाठी)

विविध प्रकारचे कार्यक्रम, खेळ व सुरेख गाण्यांचा कार्यक्रम
बसच्या क्षमतेमुळे जागा मर्यादित. निराशा टाळण्यासाठी वरील रक्कम आपल्या बँकेच्या नौपाडा, ठाणे शाखेत क्र. १८१६ मध्ये भरावी.

– संपर्क –

सुरेश पालेकर ९९६९४५५३७०
राजेश दिवेकर ९६१९३६२४६०
अरुण वाघ ९८२०३७७१०२



श्रीमती कमल सदानंद वागळे (बाड)
देवाज्ञा - १० जून २०१६



नाही समजली आम्हां ही दैवाची खेळी,
निरोप घेतलास तूं जगाच्या अवेळी,
निखळला खांब डगमगल्या भिंती,
ऐन सुखाच्या क्षणी हरवली मूर्ती,
मनी होता भोळेपणा व सोशीकपणा,
कधी ना दाखविला मोठेपणा.
चेहरा होता हसतमुख
सर्वांना दिला आनंद खूप,
अजूनही होतो भास,
तू आहेस जवळपास

वागळे परिवार, ठाणे

# संपादकीय

## संघाचे अध्यक्ष श्री. मारुती दळवी व एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष श्री. देवदास नाडकर्णी उभयतांची पंच्याहत्तरी

आयुष्याच्या वाटचालीत अमृत महोत्सवी वर्षाचा पल्ला गाठणे ही एक विशेष घटना असते. आपल्या दोन्ही संस्थांचे विद्यमान अध्यक्ष श्री. मारुती दळवी व श्री. देवदास नाडकर्णी यांनी हा अमृतानुभव अलीकडेच घेतला याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन.

आपल्या संघाचे अध्यक्ष श्री. मारुती दळवी यांनी अगोदरच हा टप्पा पार केला तर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष श्री. देवदास नाडकर्णी यांची यावर्षी ९ एप्रिल २०१९ रोजी पंच्याहत्तरी पूर्ण होत आहे. संघाची ८३ आणि एज्युकेशन सोसायटीची ११४ वर्षांची उज्ज्वल परंपरा अखंड पुढे नेण्याची जबाबदारी या अवघे पाऊणशे वयोमान असणाऱ्या द्वयीने यशस्वीरीत्या पेलली आहे यात शंका नाही. संस्थांच्या वाटचालीसाठी जसा दाम महत्त्वाचा आहे तसा घामही. वेळेचे बहुमूल्य योगदान देत अथक मेहनत घेणारे हे दोघेही त्यांच्या विद्यार्थीदशेत एज्युकेशन सोसायटीच्या शिष्यवृत्तीचे लाभार्थी होते. तेव्हापासून जोपासलेली कृतज्ञतेची भावना त्यांनी स्वीकारलेल्या या जबाबदारीतून प्रतीत होते.

श्री. मारुती दळवी हे ६ नोव्हेंबर १९९८ पासून संघाच्या कार्यकारिणीमध्ये आहेत. २०११ ते २०१६ या कालखंडात ते संघाचे उपाध्यक्ष होते आणि २०१६ मध्ये त्यांनी अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतली. ठाणे उपनगरातून गिरगावात ये जा करणे जिकिरीचे असूनही ते ज्या उमेदीने वावरतात ती वाखाणण्याजोगी आहे. समाजसेवा असो किंवा वैद्यकीय मदत, सर्व वयोवृद्धांना आर्थिक मदत उचितपणे मिळावी यासाठी संघाकडील निधीचा विनियोग ते चोखपणे करत असतात. आपल्या दोन्ही संस्थांचा कारभार अजून सुरळीत कसा करता येईल याचा सदैव विचार करणारी दुसरी व्यक्ती म्हणजे श्री. देवदास नाडकर्णी. ते २ ऑगस्ट २००० रोजी संघ व सोसायटीच्या सेवेत रूजू झाले. २००६ पासून ते सोसायटीचे अध्यक्षपद भूषवीत आहेत. सोसायटीकडे मदत मागणाऱ्या गरजू विद्यार्थ्यांना अधिकाधिक आर्थिक साहाय्य करण्याकडे त्यांचा कल असतो. ज्ञातीतील गुणी विद्यार्थ्यांचा गौरव म्हणजे आपल्या समाजाचाच सन्मान अशी त्यांची नेहमी धारणा असते. आपल्या दोन्ही संस्थांना परदेशातून मिळणाऱ्या परकीय चलनातील देणग्यांसाठी केंद्रीय गृहखात्यातून परवाना मिळविण्याचे कठीण कामदेखील या दोघांच्या महत्प्रयासाने साध्य झाले आहे. स्नेहसंमेलन इत्यादी संघाचे सालाना कार्यक्रम तसेच ठाणे व मुंबई मंचाचे विविध उपक्रम आयोजित करण्यात यांचा नेहमीच सक्रीय सहभाग असतो.

आपल्या अमदानीत दोन्ही संस्थांचा लौकिक वृद्धिंगत करणाऱ्या या द्वयींना आरोग्यसंपन्न व सेवामय दीर्घायुष्य लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना. जीवेत्. शरदः शतम्!

(शब्दांकन : डॉ. विवेक कुलकर्णी, उपाध्यक्ष, एज्युकेशन सोसायटी)

द.ना.नाडकर्णी

# एज्युकेशन सोसायटी – शिष्यवृत्तीसंबंधी निवेदन

एज्युकेशन सोसासटीतर्फे शालेय व महाविद्यालयीन शिक्षणासाठी आर्थिक साहाय्य दिले जाते. लाभार्थीनी अर्ज पाठविण्याची शेवटची तारीख पुढीलप्रमाणे:

| | |
|---|---|
| १ ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी | ३० जून २०१९ |
| महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी | ३० जुलै २०१९ |

(मेडिकल व इंजिनियरिंगच्या विद्यार्थ्यांनी प्रवेशानंतर अर्ज पाठवले तरी चालतील) याशिवाय खाली नमूद केलेल्या अभ्यासासाठीही शिष्यवृत्ती देण्यात येतात. संबंधित पालकांनी व गरजू विद्यार्थ्यांनी याची कृपया नोंद घ्यावी व त्याचा पूर्ण लाभ घ्यावा. ही विनंती.

**विषय :**

- संगीत, नाटक, नृत्य
- व्यायाम, क्रीडा, गिर्यारोहण
- राज्य व राष्ट्रीय पातळीवरील परीक्षा (सी.ए.कॉस्टिंग, एन्.डी.ए. सिव्हील सर्व्हिसिस इ)
- संगणकावर आधारित प्रशिक्षण
- वैदिक अभ्यासक्रम, गीताभ्यास
- जर्मन, फ्रेंच इत्यादी परकीय भाषा
- शैक्षणिक सहल

दहावी–बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी खास वर्ग किंवा कोचिंग क्लासेस यासाठी लागणारा खर्च संस्थेच्या उत्पन्नानुसार देण्यात येईल व तो कार्यकारिणीच्या विचाराधीन असेल.

**कर्जाऊ शिष्यवृत्त्या :** उच्च शिक्षणासाठी कर्जाऊ शिष्यवृत्त्या देण्यात येतात.
भारतातील उच्च शिक्षण रु. २,००,००० (प्रतिवर्षी १,००,०००)
परिदेशातील उच्च शिक्षण रु. २,००,००० (एक रकमी)

**गृहिणींसाठी :** गृहिणींसाठी कुठल्याही व्यावसायिक किंवा संगणक शिक्षणासाठी अर्ज करुन शिष्यवृत्तीचा लाभ घेता येईल.
शैक्षणिक पात्रता : बारावी

विशेष माहितीसाठी कार्यालयात येऊन चौकशी करावी अथवा २३८७७३०१ वर कार्यालयीन वेळांत संपर्क साधावा.

# प्रकाशझोत

## इतिहासाचार्य धुमें लिखित 'श्री मंगेश देवस्थान समग्र इतिहास' या संदर्भ ग्रंथाचे पुनर्मुद्रण

गोमंतक प्रदेश म्हणजे देवभूमी ऊर्फ पुण्यभूमी असे समीकरणच होय. स्वच्छ व निसर्गरम्य परिसरांनी डोळ्यांची पारणे मिटविणारी असंख्य रम्य व आकर्षक मंदिरे हे गोमंतकाचे वैशिष्ट्य. तेथील प्रत्येक मंदिराला स्वतःचा स्वतंत्र इतिहास व परंपरा आहे. अशा सर्व मंदिरात प्रियोळ येथील श्री मंगेश देवस्थान सर्वांत प्रसिद्ध व उत्कृष्ट आहे. गोव्यातील प्रत्येक देशी विदेशी पर्यटकाच्या दौऱ्यामध्ये श्री मंगेश देवस्थानची भेट हे ठरलेलेच असते एवढी या देवस्थानची महती. अशा या शेकडो वर्षाची उज्ज्वल परंपरा लाभलेल्या देवस्थानची इत्थंभूत माहिती गोमंतकीय मंदिराचा चालता बोलता ज्ञानकोश म्हणून ओळखले जाणारे दिवंगत इतिहासाचार्य श्री. विनायक नारायण शेणवीं धुमें यांनी १९७१ साली विजयादशमीच्या सुमुहूर्तावर 'श्री मंगेश देवस्थान–समग्र इतिहास' हा संदर्भ ग्रंथ लिहून प्रकाशित केला. देवस्थानची स्थलांतरपूर्व तसेच सांप्रतची मालमत्ता, पूर्वापार चाललेल्या चालीरीती, व्यवस्थापन विषयक माहिती, दैनंदिन कार्यक्रम, देवकृत्यांचा तपशील, वार्षिकोत्सव, प्रसाद कौल वितरण वगैरेबद्दलची साद्यंत हकीकत मंदिरांत येणाऱ्या भाविकांसाठीच नव्हे तर चौकस रसिकांनाही उपयुक्त ठरेल यात शंका नाही. या ग्रंथाचे संदर्भमूल्य ओळखून अमेरिकन लायब्ररी कॉंग्रेसने या पुस्तकाच्या वीस प्रती घेऊन अमेरिकेत जेथेजेथे मराठीच्या अभ्यासाची केंद्रे आहेत तेथे त्या भेट म्हणून दिलेल्या आहेत.

सुमारे पन्नास वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या या पुस्तकाच्या प्रती सध्या उपलब्ध नाहीत. म्हणून अलीकडेच देवस्थानच्या व्यवस्थापक मंडळीने या ग्रंथाचे पुनर्मुद्रण करण्याचा सुबुद्ध निर्णय घेतला. त्यानुसार या ग्रंथाचे २०१९ साली रथसप्तमीच्या शुभमुहूर्तावर पुनर्प्रकाशन करण्यात आले. श्री मंगेशाच्या प्रत्येक महाजनाच्या संग्रहात हा ग्रंथ असावा हे आवाहन.

'श्री मंगेश देवस्थान समग्र इतिहास' मूल्य रु. ३००

मुंबईमध्ये उपलब्ध द. ना. नाडकर्णी, विले पारले, फोन. ०२२–२६१२४१६२

## गणेशोत्सव मंडळ, सरस्वती बाग, जोगेश्वरी. टाईम्स ग्रीन गणेशोत्सव पुरस्काराचे प्रथम विजेते

गेल्या काही वर्षापासून सरकारने प्रदूषणांत घट होण्याच्या दृष्टीने विविध पावले उचललेली आहेत. टाईम्स ग्रुपच्या साहाय्याने पर्यावरण स्नेही पद्धतीने गणेशोत्सव साजरा करण्यातून येणारे फायदे जनतेपर्यंत पोहचविण्याचा स्पर्धेमार्फत साकार करण्याचा

त्यांचा हेतू आहे. या उपक्रमास प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. यंदाच्या ११ व्या पर्वाचा पुरस्कार सोहळा २७ डिसेंबर रोजी सह्याद्री अतिथी गृहात पर्यावरण मंत्री रामदास कदम यांच्याहस्ते पार पडला. 'गृहनिर्माण संस्था' या गटांत मुंबईतील मिनी कारवार समजल्या जाणाऱ्या जोगेश्वरी येथील सरस्वती बागेतील गणेशोत्सव मंडळाला प्रथम पुरस्कार मिळाला. पर्यावरण स्नेही गणेशमूर्ती, सजावट, ध्वनीप्रदूषण विरहीत मिरवणूक, विसर्जन अशा चार घटकांचा निकशामध्ये समावेश होता.

सदर गणेशोत्सव मंडळाची स्थापना सन १९२३ साली झाली होती. उपनगरातील हे सर्वात जुने मंडळ आहे. हे मंडळ लवकरच शतक संपूर्ण करेल. पूर्वी गणेशोत्सव शांताराम मंगेश हॉल येथे संपन्न होत असे. आता तो हॉल मोडकळीस आल्याने तो रामेश्वर मंदिरात साजरा होत असतो.

## रिअर ॲडमिरल रवीन्द्र नाडकर्णी यांना अति विशिष्ट सेवा पदक
## वडील ॲडमिरल जयंत नाडकर्णी यांचा उज्ज्वल वारसा पुढे चालविला.

आपल्या ज्ञातीचेच नव्हे तर अख्या कारवारकरांचे भूषण म्हणजे ॲडमिरल जयंत गणपत नाडकर्णी. त्याना मागे अतिविशिष्ट सेवा पदक मिळाले होते. व नंतर त्यांना परमविशिष्ट सेवा पदकांनेही सन्मानित करण्यात आले होते. त्यांचे सुपुत्र रिअर ॲडमिरल रवीन्द्र नाडकर्णी यांनी वडिलांचा उज्ज्वल वारसा पुढे चालविला आहे. अलीकडेच २६ जानेवारीच्या प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला रवीन्द्र यांना अति विशिष्ट सेवा पदकाचा पुरस्कार मिळाला. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन. सध्या २०१६ पासून नौसेनेच्या सदर्न कमांडचे ते प्रमुख म्हणून कोची येथे कार्यरत आहेत. काही वर्षे ते कारवार येथे सीबर्ड या आशियातील सर्वात मोठ्या नाविक तळाचे ऑफिसर इन कमांड या पदावर होते.

खडकवासला येथे एन.डी.ए च्या खडतर प्रवेश परीक्षेतून त्यांची तेथे निवड झाली होती. तीन वर्षाच्या कोर्सनंतर अंतिम परीक्षेत नौसेनेच्या तुकडीतून ते सर्वप्रथम आले होते. जयंतरावही विद्यार्थीदशेत असताना तेव्हाच्या डफरीन या शिकाऊ जहाजावरुन राष्ट्रकुल स्तरावर विद्यार्थ्यांत दुसरे आले होते.

## हिंदू हायस्कूलच्या १९६५ च्या तुकडीचे ५३ वर्षानंतर पुनर्मीलन

वाचून भांबावलात ना? सांगतो. सुधीर वाघ हे कारवारच्या हिंदू हायस्कूलचे १९६५ तुकडीचे एस.एस.सी चे विद्यार्थी. आजचे वय ७१. सध्या ते मुंबईत माहीमला वास्तव्यास असतात. प्रकृतीमुळे ते बाहेर हिंडू फिरु शकत नाहीत. परंतु त्यांचा कारवारकरात फोनद्वारे संपर्क ठेवण्याचा हातखंडा विलक्षण! मला वाटते आपल्या या मुखपत्रिकेचे संपादक डी. एन. नाडकर्णी नंतर फोनवर कारवारकरांच्या संपर्कात असणाऱ्यात

हेच असावेत. फोनद्वारे ते घरबसल्या अनेकांची विविध कामे चुटकी सारखी करतात.

ह्याच ध्यासापायी त्यांनी गेल्या दोन वर्षात घर बसल्या आपल्या जुन्या मित्रांचा शोध घेण्यास सुरवात केली. अथक प्रयत्नांनी भारतभर विखुरलेली मित्रमंडळी एकत्र केली. तरीही त्यांचे समाधान झाले नाही. शेवटी जमेल तितक्या वर्ग मित्रांना एकत्र आणण्याचा त्यांनी घाट बांधला. गेल्या चार महिन्यात फोनवर आमंत्रणे देऊन त्यांनी १६ डिसेंबरला आपल्या सोसायटीच्या सभागृहामध्ये सर्वांचा स्नेहमेळावा आयोजित केला.

त्यांच्या विनंतीला मान देऊन मुंबई, गोवा, कारवार, होन्नावर, पुणे, बेळगाव व हैद्राबाद येथून ३८ मंडळी उपस्थित राहिली. खरच कौतुकास्पद! कारण ती आता आजी–आजोबा झाली होती. सर्वांनी एकत्र जमून शाळेच्या, शिक्षक–शिक्षिकेंच्या आठवणी जागवल्या. एकमेकांच्या ओळखी दृढ झाल्या. सुधीरने दिलेल्या कारवारी जेवणावर ताव मारुन मेळावा संपन्न झाला. दरवर्षी असाच मेळावा आयोजित करण्याचे ठरविले. जाताजाता सर्वजण सुधीरला मनापासून धन्यवाद देत जुन्या आठवणींचे गाठोडे घेऊन घरी परतले.

**रवीन्द्र बोरकर, दादर**

## सौ. मीरा तेलंग प्रभूवेर्लेकर यांचा तिसरा ललितलेख संग्रह 'आठवणींच्या पारावर' प्रकाशित

कारवार येथील गेल्या पिढीतील एक प्रतिष्ठित समाजसेवक रा. ब. गणपतराव तेलंग यांची नात सौ. मीरा निशीथ प्रभूवेर्लेकर आत्मानुभूतीला प्रकट रुप देण्याच्या उद्देशाने ललित लेख लिहीत असतात. त्यांमुळे अप्रत्यक्षपणे नकळत समाज मानसाचे प्रबोधनही व्हावे अशी त्यांची मनोधारणा आहे. अकृत्रिम हृदय संवाद करणाऱ्या त्यांच्या सहज शैलीला बुद्धीप्रामाण्यवादी विचारांची आपोआप दिशा प्राप्त होते. आतां पर्यंत त्यांचे 'रंग उगवतीचे' व 'दीपकन्या' या दोन ललित लेख संग्रहाचे प्रकाशन झाले आहे व रसिकांकडून व मान्यवरांकडून त्यांना भरभरुन प्रतिसाद मिळाला आहे. अलीकडेच पणजी येथे २१ जानेवारी रोजी गोवा मराठी अकादमी या नामांकित संस्थेतर्फे त्यांच्या 'आठवणींच्या पारावर' या तिसऱ्या ललित लेख संग्रहाचे प्रकाशन झाले. गोमंतकांतील जेष्ठ साहित्यीक व गोवा विद्यापीठाचे निवृत्त मराठी विभाग प्रमुख डॉ. सोमनाथ कोमरपंत यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन झाले. या पुस्तकाला प्रस्तावनाही त्यांचीच आहे. या समारंभाला साहित्य जगतांतील व माध्यम क्षेत्रांतील प्रतिष्ठित मंडळी उपस्थित होती. मीराताईंच्या भावी काळांतील भावस्पर्शी लेखनासाठी शुभेच्छा.

**(सौ. मीरा प्रभूवेर्लेकर, संपर्क – ९४२०२०२४२३९६)**

(पुढील मजकूर पृ ३५ वर)

# ‘एजिस ४ सिनिअर्स’ ची साथ संगत

वयाची ऐंशी ओलांडलेले लता आणि गिरीश... मुलगा आणि सून दोघेही कामावरुन घरी येईपंत रात्रीचे ८–९ वाजतातच. गेल्या काही वर्षापर्यंत रस्त्यावर एक चक्कर मारली जायची पण आता इतक्या रहदारीच्या रस्त्यावरुन चालायचा आत्मविश्वास नाही उरला आणि पायही साथ देत नाहीत. दिवसभर टि.व्ही. समोर बसूनही वेळ जाता जात नाही... आणि स्पेशॅलिस्टच्या अपॉइंटमेंटसाठी मुलांना दरवेळी रजा मिळत नाही.

गेल्या काही वर्षात हेमाची काळजी घेता घेता ७८ वर्षांचे शरद खूप थकून गेले आहेत. मुलं प्रेमानं त्यांच्याकडेच राहायला बोलावतात पण हे जात नाहीत. आपल्याच घरी राहून फक्त स्वत:साठी थोडा वेळ असावा, कोणाशीतरी मन भरुन गप्पा माराव्या असे तीव्रतेने वाटतं. पूर्वी वाचलेल्या काही पुस्तकांबद्दल बोलावं, कोणाच्या सोबतीनं नाटक बघायला जावं असं खूप वाटतं.

आयुष्याच्या संध्याकाळी काही ना काही कारणाने आपले स्वत:चे वेगळे भावनिक, मानसिक, शारीरिक प्रश्न घेऊन घरट्यात एकाकी असलेली ही ज्येष्ठ मंडळी... आपल्याला नक्कीच अनोळखी नाहीत ! त्यांच्या गरजा योग्यरीत्या पूर्ण करण्याचे मोलाचे काम करते

**‘एजिस ४ सिनिअर्स’ (Aegis 4 Seniors Pvt. Ltd.)**

या कंपनीचे वैशिष्ट्य म्हणजे प्रशिक्षित सोशल वर्कर्सचा सहभाग –
ज्येष्ठ व्यक्तींच्या घरी जाऊन, त्यांच्याशी, त्यांच्या कुटुंबीयांशी चर्चा करुन ज्येष्ठांच्या गरजेप्रमाणे सर्व्हिसेसचा प्लॅन आखणे !

**ह्या कंपनीच्या सेवा :**

- ज्येष्ठ व्यक्तींची फोनवरुन नियमित चौकशी करुन त्यांना आवश्यक असलेल्या सुविधांची तरतूद करणे.
- घरी जाऊन त्यांच्याशी गप्पा करणे, त्यांच्या मानसिक, बौद्धिक गरजेप्रमाणे एखाद्या ॲक्टिव्हीटीमध्ये त्यांना गुंतवणे.
- ज्येष्ठ व्यक्तींबरोबर फेरफटका मारणे, दुकानात, डॉक्टरांकडे इ. घेऊन जाणे.
- जीवनातले अनेक उन्हाळे–पावसाळे बघितलेल्या या ज्येष्ठांच्या खास आठवणींची, अनुभवांची, इच्छांची त्यांनी स्वत: सांगितलेली आणि आमच्या क्रिएटिव्ह टीमने कलात्मकतेने उलगडलेली ‘गोष्ट माझ्या आयुष्याची’ !

**अधिक माहितीसाठी फोन करा : ८४४८४४५५८७**

**(सोम. ते शनि. – सकाळी ९ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत)**

# कारवारकरांचा लाडका नातू पु.लं. विषयीच्या वैयक्तिक जीवनातील आठवणी

पुलंच्या या जन्मशताब्दी वर्षात, साहित्य, संगीत, नाट्य या विविध क्षेत्रात त्यांनी केलेल्या बहुमोल कामगिरीला या क्षेत्रातील नामवंत व्यक्तींनी उजाळा दिला आहे. परंतु त्यांच्या विषयीच्या माझ्या वैयक्तिक जीवनातील आठवणी सांगाव्याशा वाटल्या म्हणून हा लेख लिहीत आहे.

माझे ते जवळचे नातेवाईक होते. त्यांची आई कमळाक्का माझ्या वडिलांची चुलत बहीण. ती दुभाषी होती. वामन मंगेश दुभाषी यांची कन्या. 'ऋग्वेदी' या नावाने त्यांनी 'आर्यांच्या सणांचा इतिहास' हा गद्य आणि टागोरांची गीतांजली यांचा मराठी अनुवाद प्रसिद्ध केला. पुलंनी 'गणगोत' मध्ये 'ऋग्वेदीं' यांच्यावरील लेखाचा समावेश आहे. त्या संग्रहातील पहिलाच लेख. वामन मंगेश दुभाषी माझे आजोबा (वडिलांचे वडील) यांचे थोरले बंधु, व्यवसायाने ते शिक्षक होते. आमचे गाव कारवार तेथे त्यांनी आपल्या काही सहकाऱ्यांबरोबर हिंदू हायस्कूल या शाळेची स्थापना केली. एक दर्जेदार शाळा म्हणून ती नावारूपाला आली. त्यातून बाहेर आलेल्या एक विद्यार्थ्यांने मॅट्रिक परीक्षेत पहिला क्रमांक मिळविला. अनेकांनी चांगले यश मिळविले व भावी जीवनात विविध क्षेत्रात त्यांनी चमकदार कामगिरी केली. पुढे वामन मंगेश दुभाषींनी (आम्ही त्यांना 'अण्णा' म्हणत असू) कारवार सोडले व ते विलेपार्ल्याला स्थायिक झाले. त्यांच्या बरोबर कारवारकडच्या अनेक गौड सारस्वत ब्राह्मणानीही आपली घरे बांधली व दुसरे 'कारवार' पार्ल्याला उभे केले. पुलंचे बालपण पार्ल्यात गेले. त्याविषयीच्या त्यांच्या आठवणी पुलंनी आपल्या निरनिराळ्या लेखांत लिहिल्या आहेत.

पुढे पु. ल. कॉलेज शिक्षणासाठी पुण्यात आले. आम्ही त्यावेळी पुण्यात होतो. त्यावेळी काही वर्षे 'शेतकी कॉलेजच्या जवळ असणाऱ्या मोदी बागेत' आणि नंतर शिवाजीनगरमध्ये रेव्हेन्यू कॉलनीतील आमच्या घरी पुलं आल्याचे आठवते. ते आईवडिलांना भेटायला येत. त्यांना 'बाबुली' या नावाने आम्ही ओळखत असू. येताना आम्हा मुलांसाठी खाऊ आणण्यास विसरत नसत. ते आई–वडिलांशी कोकणींत (आमची व पुलंची मातृभाषा, त्यांची पितृभाषा व साहित्याची भाषा मराठी) गप्पा मारल्यानंतर हळूच आम्ही मुले काय करतो हे पाहण्यासाठी आतल्या खोलीत डोकावत. एकदा मी एक पुस्तक वाचत बसलो होतो. पुलंनी ते पाहिले. मी हरि नारायण आपटेंची 'मधली स्थिती' ही कादंबरी वाचत होतो. हा मुलगा नुसतीच

शालेय पाठ्यपुस्तकांची घोकंपट्टी करत नाही, काही चांगले साहित्य वाचतो यावर त्यांना आनंद झाला. मी पुस्तके वाचतो हे लक्षात ठेवून माझ्या एका वाढदिवशी त्यांनी साने गुरूजींचे 'धडपडणारी मुले' हे पुस्तक मला भेट दिले. त्या दिवसांत ते स्वतःच संगीत, साहित्य, नाट्य क्षेत्रात काही दर्जेदार कामगिरी करावी म्हणून धडपडत होते. पुढे या सर्व क्षेत्रात त्यांचे नाव झाले.

१९४६ साली बॉम्बे युनिव्हर्सिटीच्या मॅट्रिक परीक्षेत मी सर्व मुंबई प्रांतात( त्यात पश्चिम महाराष्ट्र, गुजरात व उत्तर कर्नाटकातील जिल्हे यांचा समावेश होता.) पहिला क्रमांक मिळविला त्यावेळी पुलंनी मला अभिनंदनपर पत्र लिहिले व खास पुलं टच देऊन लिहिले की, तुझ्या या यशामुळे माझ्या अंगावर मूठभर मांस चढले आहे! खरं तर त्यांच्या पत्रातील कौतुकपर शब्दांनी माझ्याच अंगावर मूठभर मांस चढले होते! सुनीता ठाकूर यांच्याशी विवाहबद्ध झाल्यानंतर पुल त्यांना घेऊन आमच्या घरी आईवडिलांचे आशीर्वाद घेण्यासाठी आमच्या घरी येऊन गेले.

एम्. ए . त पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झाल्यानंतर लागलीच मी आय्.ए.एस्. परीक्षेला बसलो. माझी निवड झाली आणि त्यानंतर माझे वास्तव्य पुण्याच्या आणि महाराष्ट्राच्या बाहेरच झाले व त्यांच्या भेटीचा योग बरीच वर्षे आला नाही.

निवृत्तीनंतर मी पुण्यात स्थायिक व्हायचे ठरवले व पुण्यात हिंगणे परिसरातील ( आता त्याचे 'कर्वेनगर' झाले आहे) सहवास गृहरचना सोसायटीत माझा बंगला बांधला. तेथे येण्यासाठी पुलंना मी आग्रहाचे आमंत्रण दिले. ते त्यांनी स्वीकारले व आई (कमळाक्का) व पत्नी (सुनीता वहिनी) यांच्याबरोबर ते आले. चहापाणी झाल्यानंतर सायंकाळच्या सुमारास त्यांना गच्चीवर नेले व त्यांना पश्चिमेला सिंहगड, दक्षिणेला पर्वती व उत्तरेला चतुःश्रृंगी यांचे दर्शन घडविले. ते दृश्य व आजुबाजूची झाडी पाहून ते आनंदित झाले.

पण पुण्यात बंगला बांधला व काहीच दिवसांत एके दिवशी गोव्याहून राज्यपाल खुर्शिद आलम खान यांचा मला फोन आला. गोवा विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून मी यावे असे त्यांनी मला आमंत्रण दिले व ते मी स्वीकारले. पाच वर्षे मी गोवा विद्यापीठाचे कुलगुरु म्हणून काम केले. गोवा विद्यापीठाचा विशाल परिसर ताळगाव (पणजीच्या बाहेर चार पाच किलोमीटर) च्या पठारावर पसरला आहे. कुलगुरुंचे निवासस्थान या पठाराच्या एका टोकावर आहे. विद्यापीठाच्या सर्वच इमारती व कुलगुरू निवासस्थानाचा दुमजली पण छोटासा बंगला आर्किटेक्ट सतीश गुजराल यांनी अतिशय कलात्मक रीतीने बनविला होता. कुलगुरुंच्या बंगल्यासमोरच पाणी भरून वाहणारी झुआरी नदी व नदी पलीकडे वॉस्को बंदर. तिथल्या बोटी व रात्री चमचमणारे दिवे, समोर विशाल सागर असा तो स्वप्नवत वाटणारा देखावा होता. 'संथ

झुआरी अथांग सागर सामोरी दिसतो' असे वर्णन मी माझ्या विद्यापीठावरच्या कवितेत केले होते. बंगल्यातून सूर्योदय व सूर्यास्त पाहणे हा प्रत्येक दिवशी माझा सर्वांत महत्त्वाचा कार्यक्रम असे. हा विलोभनीय निसर्गाचा अविष्कार पाहण्यासाठी रवींद्रनाथ टागोरच असावेत असे मला राहून राहून वाटे आणि एक दिवस 'महराष्ट्राचे रवींद्रनाथ टागोर पु.ल.' यांनी भेट देण्याचा योग आला.

पुलंना गोवेकरांनी त्यांचा सत्कार करण्यासाठी आग्रहाचे आमंत्रण दिले व ते त्यांनी स्वीकारले. ते सपत्नीक आले. त्यांनी माझ्या घरी राहावे असे मी त्यांना आमंत्रण दिले. पण त्या आमंत्रकांनी आधीच त्यांच्या निवासाची व्यवस्था केल्यामुळे माझे आमंत्रण ते स्वीकारु शकले नाहीत. पण त्यांच्या गौरवाचा समारंभ संपल्यानंतर त्यांनी संध्याकाळी माझ्या बंगल्यावर थोडा वेळ यावे अशी मी विनंती केली व त्यांनी ती स्वीकारली.

त्यांच्या गौरव समांभाचे अध्यक्षपद मी स्वीकारावे अशी निमंत्रकांनी मला विनंती केली व ती मी आनंदाने स्वीकारली. समारंभ पणजीच्या कला मंदिराच्या भव्य सभागृहात होता. सभागृह तुडुंब भरले होते. मी माझ्या प्रारंभीच्या भाषणात म्हटले, "या प्रेक्षकांनी तुडुंब भरलेल्या सभागृहाकडे दृष्टिक्षेप टाकल्यावर लगेच लक्षात येते की पुलं जसे महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व आहे तसेच ते चिमुकल्या गोव्याचे सुद्धा लाडके व्यक्तिमत्त्व आहे." टाळ्याचा कडकडाट करुन जमलेल्या समस्त गोवेकरांनी त्याला अनुमोदन दिले. माझ्या भाषणानंतर वक्ते म्हणून आमंत्रित केलेले ज्ञानेश्वर नाडकर्णी बोलले. आमच्या दोघांची भाषणे ऐकूण पुलं मिश्किलपणे म्हणाले, "या दोघांची भाषणे ऐकून हा घरगुती समारंभ आहे की काय असे मला वाटले" हे ऐकल्यावर श्रोत्यांत खसखस पिकली!

समारंभानंतर थोडी विश्रांती घेऊन पुलं, सुनिता वहिनी व त्यांचे काही नातेवाईक विद्यापीठातील माझ्या बंगल्यात आले. संध्याकाळची वेळ होती, म्हणून मी बंगल्याच्या हिरवळीवरच चहापानाचा कार्यक्रम ठेवला. गप्पा सुरु झाल्या. परंतु त्यात भाग न घेता पुलं टक लावून समुद्रात मावळणाऱ्या सूर्याच्या लाल सोनेरी छटा पाहत स्वत:त हरवून गेले होते. चहापाणी झाल्यानंतर मी पुलंना कारमधून गोवा विद्यापीठाच्या परिसरात फिरवून आणले.

गोव्याहून पुण्याला परतल्यानंतर पंधरा दिवसांत पुलंचे स्वत:च्या हस्ताक्षरात लिहिलेले पत्र मला मिळाले. त्यात त्यांनी लिहिले– "माझ्या गोवा भेटीचा कळसाध्याय म्हणजे तुझ्या बंगल्याच्या हिरवळीवर घालवलेली संध्याकाळ आणि त्यावेळी घेतलेले मावळत्या सूर्याचे दर्शन. 'अणुरेणु तोकडा, तुका आकाशा एवढा' अशी माझी मनस्थिती झाली!" हे पत्र मी जपून ठेवले.

गोवा विद्यापीठात पाच वर्षे राहिल्यानंतर मी पुण्यात परतलो. परतल्यानंतर मधुन मधुन पुलंच्या घरी मी व माझी पत्नी जात असू. असेच एकदा संध्याकाळी येतो म्हणून भेट ठरली. परंतु त्या दिवशी सकाळी मी त्यांना कळविले की, संध्याकाळी बजेट स्पीच ऐकायची माझी इच्छा आहे, आम्ही नंतर केव्हातरी येऊ.

पण ती भेट झालीच नाही. पुलंची तब्येत बिघडली व प्रयाग हॉस्पिटल मध्ये त्यांना ॲडमिट केले. आम्ही हॉस्पिटलमध्ये गेलो. परंतु ते बोलण्याच्या अवस्थेत नव्हते. त्यांना पाहून आलो एवढेच. डॉ. शिरीष प्रयागांच्या अथक व निष्णात प्रयत्नानंतरही त्यांची प्राणज्योत मावळली. त्या दिवशी मी त्यांच्या घरी जाऊन भेटलो नाही, याची रुखरुख मनात कायमची राहिली. पु. ल. एकदा म्हणाले होते, "जीवन ही जन्म व मृत्यू या दोन टोकांमधली एक फसवणूक आहे."

**डॉ. पद्माकर रा. दुभाषी, IAS (Retd.)**
पद्मभूषण सन्मानीत
माजी कुलगुरु, गोवा विद्यापीठ
३४, 'पद्मसिंधु', सहवास सोसायटी
कर्वेनगर, पुणे. दूरध्वनी (०२०) २५४४०२७२

## विजूले चुटकुले

**टीचर** : **अरे मारुती, नंदुरबार खंय आसा सांग पळव्या**
**मारुती** : **सर, माका खबर्ना. हांव मगेल्या बाप्पाक विचार्न सांगता. ताका सगळे बार खबर आसात.**

---

**मांव** : **(जांवयाक) आज फालफाल्यावैले तुगेले येवप कशे जाले ?**
**जांवय** : **तुमगेल्या धुवेबरोबर मगेले कडाक्याचे झगडे जाले आणि माका सांगले तूं मसण्यात वच. म्हण्ण हाव हांगा आयलो.**

विजय सदानंद वागळे, ठाणे
९२२१६०७५७७

# ऋणको ते धनको - एक अनोखा प्रवास ( ३ )

**१. देवीकृपेची अनुभूती ( २ )** - श्री देवीच्या कृपेची अनुभूती आपल्याला बऱ्याच प्रकारे अनुभवास येते. आरोग्य, धन, मानसिक समाधान, मुलाबाळांचे सौख्य, त्यांची प्रगती, घोर संकटातून मुक्तता वगैरे वगैरे. कधीकधी आयुष्यात आपल्याला नकळत काही अशा व्यक्तींची भेट होते, मग ती अल्प काळाकरिता जरी असली तरी जन्मभर आपण त्यांना विसरु शकत नाही. अशा पुण्यात्म्यांच्या सहवासांत काढलेले काही क्षण सुद्धा माझ्या मते देवीकृपेचीच अनुभूती होय.

माझ्या आयुष्यात सुद्धा अशा दोन पुण्यात्म्यांनी काही काळाकरिता दखल दिली आणि खरी श्रद्धा कशी असते, देवी कार्याकरिता शारीरिक आणि मानसिक समर्पणाची पातळी किती उच्च असू शकते याचे प्रात्यक्षिक अनुभवावयास मिळाले.

हे दोन पुण्यात्मे म्हणजे १ ) श्री. दुर्गाराव ( वसंत) शांताराम बोरकर (DS) आणि २ ) श्री. दुर्गाराव कृष्णराव बोरकर (DK)

मी थोडक्यात त्यांचा परिचय करुन देतो -

**१ ) श्री. डी. एस. बोरकर (DS)** - व्यवसायाने सिव्हील इंजिनियर. सचिवालय - आताचे मंत्रालय, त्यांच्याच देखरेखीखाली निर्माण झाले. त्यांचा हुद्दा त्यावेळी Executive Engineer असा होता. कालांतराने ते PWD चे Chief Engineer व नंतर महाराष्ट्र हाऊसिंग बोर्डचे कमिशनर म्हणून प्रसिद्ध झाले. निवृत्त झाल्यावर त्यांनी स्टेट बँकेचे तांत्रिक सल्लागार म्हणून चार्ज घेतला व भारतातल्या सर्व स्टेट बँकेच्या शाखा व इतर ऑफीसीसच्या नवनिर्माण तसेच मेंटेनन्सचा पूर्ण ताबा त्यांच्याकडेच होता. आपल्या अनेक ज्ञातिबांधवांना त्यांनी नोकरीला लावले होते.

**२ ) श्री. डी. के. बोरकर (DK)** - व्यवसायाने चार्टर्ड अकाऊंटंट (CA) ACC Ltd. मध्ये चीफ अकाऊंटंट होते. आपल्या N.K.G.S.B. बँकेमध्ये, स्वतः शेवटचा श्वास घेईपर्यंत, ऑडिटर होते. तसेच "बोरकर-मुझुमदार" या प्रख्यात Chartered Accountant Firm चे पार्टनर होते.

खास करुन आपल्या श्रीशांतादुर्गा मंदिराच्या चतु:शताब्दी महोत्सवानिमित्त, हे दोन्ही बोरकर १९६६ मध्ये कवळें मंदिराच्या जीर्णोद्धाराकरिता तसेच मंदिराच्या सभोवती असलेल्या अग्रशाळेच्या नुतनीकरणासाठी खास स्थापन केलेल्या - "श्री शांतादुर्गा सेवा समिती" चे प्रमुख कार्यकर्ते - आधारस्तंभ होते.

मंदिराचा जीर्णोद्धार तसेच अग्रशाळेच्या नूतनीकरणासाठी भरपूर स्टीलची आवश्यकता होती आणि मला D.S. यांचा फोन आला. माझ्या कल्पनेप्रमाणे त्यावेळी १९६६

मध्ये D.S. हाऊसिंग कमिशनर असावेत. राज्यातर्फे शेकडो घरे बांधलेल्या एका निस्पृह, स्वच्छ, निर्व्यसनी, आपल्या व्यवसायांत निष्णात आणि कमालीचा प्रामाणिक असल्याची ख्याती असलेल्या गृहस्थाने मला स्टीलकरिता फोन केल्याने मला खूपच आनंद झाला. मीही अगदी उत्साहाने त्यांची मागणी – ती सुद्धा आई शांतादुर्गेच्या मंदिरासाठी, पूर्ण करण्या मागे लागलो. त्या काळात स्टीलचा भयानक तुटवडा होता. स्टील वितरणावर नानाप्रकारचे निर्बंध होते. महाराष्ट्र कोट्यातला माल महाराष्ट्राबाहेर पुरविणे हा तर Criminal Offence होता. या दोन बोरकरांच्या संगतीत, आई शांतादुर्गेच्या सेवेत माझी गरज लागली या कल्पनेनेच मी अगदी झपाटलेल्या मनस्थितीत, कायदेनियमाची पर्वा न करता बेधडक मंदिराला स्टील दिले. ते सुद्धा महाराष्ट्राबाहेर गोव्याला पाठविण्यात आले. या प्रकरणात माझी नोकरी तर गेलीच असती, इतकेच नव्हे मला जेलसुध्दा होऊ शकली असती. पण त्या आईने सर्व सांभाळून घेतले. DS आणि DK सुद्धा बांधकाम मुदतीपूर्व पूर्ण झाल्याने धन्य झाले. मला त्यांनी श्री शांतादुर्गा सेवा समितीचा सभासद बनविले. या समितीचा मी नंतर अध्यक्ष सुद्धा झालो आणि ते सुद्धा संपूर्ण एकमताने.

एकदा DS च्या गाडीतून DK आणि मी मरीन ड्राईव्हवरुन सचिवालयाकडे जात होतो. गिरगांव चौपाटी जवळ DS ने त्यांच्या ड्रायव्हरला गाडी घेऊन नरीमन पॉईंटजवळ उभी करण्यास सांगितले आणि आम्ही तिघे चालत चौपाटीहून नरीमन पॉईंटकडे गेलो. जाताना बांधकामात काही अडचणी आल्या होत्या त्याबाबत चर्चा झाल्या. माझी भूमिका फक्त बघ्याची होती. ती चर्चा ऐकून मी मात्र अगदी बावचळून गेलो होतो. DS म्हणत होते – "जीर्णोद्धारामध्ये एक स्टील बीम खूप त्रास देत आहे. मंदिराचा काही भाग अगदी धोकादायक अवस्थेत आहे. काय करावे हेच सुचत नव्हते. तेव्हा मी परवा तिच्याशी बोललो. आमची बराच वेळ या विषयावर चर्चा झाली आणि शेवटी तिने एक मार्ग सुचविला. मला खात्री आहे की, सर्व बांधकाम आता अगदी सुरळीत पार पडेल." नंतर DK म्हणाले की, "पैशाची पण खूपच अडचण आहे. तू आज रात्री तिला विचार. यातून सुटण्याचा काही मार्ग आहे काय ?" DS ने सुद्धा ताबडतोब आजच तिचा सल्ला घेतो असे वचन दिले. मी विचार करता होतो की वारंवार "तिने" असे सांगितले, मी आज "तिला" विचारतो – ही "ती" आहे तरी कोण ? श्री शांतादुर्गा सेवा समितीची कोणी मोठी सदस्या तर नाही ! काही दिवसानंतर मी हळूच DK ना "तिच्या" बद्दल विचारले. आणि त्यांनी मला अगदी भक्तीभावाने, तन्मयतेने सांगितले की, "ती" दुसरी कोणी नसून आपली आई शांतादुर्गाच आहे. ती नेहमी DS च्या स्वप्नांत येते आणि आम्ही आमच्या सर्व अडचणींचे तिच्याकडून निराकरण करुन घेतो. सर्व दृष्टीने ती आमची सल्लागार आणि आमच्या यशाचे मुख्य गमक आहे.

माझे डोळे ओलावले. दोघांची आपल्या देवीवर केवढी ही श्रद्धा! एक निष्णात चार्टर्ड अकाऊंटंट – फक्त आकड्यांशी खेळणारा, दुसरा प्रख्यात सिव्हील इंजिनिअर – फक्त दगड–विटा–सिमेंटचाच विचार करणारा. दोघांच्या डोळ्यांत ती विलक्षण चमक! बोलताना अगदी दुसऱ्याच जगांत असल्यासारखा वावर! प्रचंड श्रद्धा, असीम प्रेम आणि तिने सुचविलेल्या उपायांवर संपूर्ण विश्वास! खर सांगतो मी घरी येऊन आई शांतादुर्गेच्या प्रतिमेसमोर अक्षरश: रडलो. केवळ आनंदाने रडलो.

या DS आणि DK च्या सहवासाचे मला विलक्षण समाधान वाटत होते. आता तुम्हीच सांगा अशा या पुण्यात्म्यांबरोबर काही वेळ सहवास ही देवीकृपेचीच अनुभूती नाही का ?

**२) देवीकृपेची अनुभूती (३)** – सन १९७१ मधील जुलैचा महिना, पावसाळ्याचे दिवस, आम्ही पुण्याहून मुंबईला येत होतो. माझ्या अँबेसेडर गाडींत आम्ही दोघे, आमची तीन मुलं – अतुल, लीना आणि सहा महिन्याची प्रीती, माझा भाऊ सतीश व त्याची पत्नी सविता, मुलांची आया अनसूया अशी आठ माणसं अगदी खच्चून भरली होती. मी गाडी चालवत होतो. त्यावेळी वाशीचा पूल झाला नव्हता आणि ठाणेमार्गेच मुंबईला यावे लागे. ठाण्याजवळील शिळफाट्याच्या परिसरांत जोरदार पावसाची सुरुवात झाली. अचानक एक मोटरसायकल समोरुन आली आणि तिला वाचविण्याच्या प्रयत्नांत मी जे ब्रेक लावले होते त्याने गाडी थांबली. पण आपोआप घसरत मागे गेली आणि रस्त्यावरुन उतरुन, एक कोलांटी मारुन, नाल्यात कोसळली. नाला पाण्याने अगदी तुडुंब भरला होता. पण आमचे नशीब इतके बलवत्तर की गाडीचा बंपरगार्ड नाल्याच्या बाजूला असलेल्या एका खाचेत अडकला आणि गाडी तशीच लोंबकळत राहिली. ३/४ गाडी त्या गढूळ पाण्यांत पूर्णपणे बुडाली होती. मागची सीट दिसतसुद्धा नव्हती. सर्वांची फक्त डोकी गाडीतच पाण्याबाहेर होती. मागे वळून बघताच लक्षांत आले की, आमची चिमुरडी सहा महिन्याची प्रीती दिसत नव्हती. बायकोला विचारले प्रीती कुठे आणि त्याचक्षणी गाडीतच पाण्यांत हात घातला. हाताला काहीतरी लागले. हात बाहेर काढताच लक्षांत आले. ती आमची प्रीती होती. काही क्षण उशीर झाला असता तर...

मला आई शांतादुर्गेचे एक बहुमोल वरदान आहे. अगदी कुठल्याही आणीबाणी प्रसंगी माझे ब्लडप्रेशर अगदी नॉर्मल असते. बुद्धी अतिशय तीव्र होते व शांतपणे मी अगदी योग्य असे निर्णय घेऊ शकतो. माझ्या भावनांचा उद्रेक आणीबाणी प्रसंगी कधीच होत नाही. मी अतिशय शांत असतो. अगदी शिस्तवार, हळूहळू पुढच्या सीटच्या खिडकीमधून आम्ही सर्वजण बाहेर आलो. कारण गाडीचे कुठलेच दरवाजे उघडत नव्हते. सर्वात शेवटी मी सुद्धा खिडकीतून बाहेर आलो. यावरुन १९७१ मध्ये मी किती बारीक ( !) होतो याची कल्पना येईल. रस्त्यावर खूपच गर्दी होती. त्यांनी आम्हांला हळूच खेचून वर काढले. या गर्दीत श्री. चोक्सी, एशियन पेंटस्‌चे

चेअरमन सुद्धा होते. चोक्सीसाहेब म्हणाले की, त्यांचे ऑफीस जवळच आहे, तेव्हां स्वत: ऑफीसला जाऊन त्यांनी आपली गाडी अपघातस्थळी माझ्या कुटुंबीयांना घरी सोडण्यासाठी परत पाठविली. फक्त मी आणि माझा भाऊ सतीश तेथेच थांबलो कारण आम्हाला क्रेनची व्यवस्था, इन्शूरन्सचे सोपस्कार, पोलीस तक्रार वगैरे पूर्ण करणे आवश्यक होते.

सर्व कामे होईपर्यंत मी अगदी शांत होतो. B.P. अगदी नॉर्मल आणि जरासुद्धा धाकधूक नाही. पण घरी गेल्यावर जवळजवळ पुढील १५ रात्री काळरात्री ठरल्या. दचकून उठायचो ! झोपेचे पूर्ण खोबरे ! B.P. त तर जबरदस्त वाढ !

आता तुम्हीच सांगा –

१. आदल्या दिवशीच एका छोट्याश्या गफलतीने बंपरगार्ड मुळ जागेवरुन बाहेर आला होता आणि केवळ त्यामुळेच तो खाचेंत अडकला गेल्याने आम्हा सर्वांचे प्राण वाचले. नाहीतर संपूर्ण गाडीच पाण्याखाली गेली असती.

२. सहा महिन्याची प्रीती काहीक्षण पूर्णपणे पाण्याखाली गेली होती. एवाद्या अदृश्य शक्तीच्या आदेशाप्रमाणे माझा हात आपोआप पाण्यांत गेला आणि प्रीती वाचली.

३. ऐशियन पेंटस्चे श्री. चोक्सी – एका अनोळखी माणसाने – आम्हाला खूपच मदत केली.

आता तुम्हीच सांगा देवी अनुभूती आणि वेगळी काय असते ?

आपले काही चिकित्सक ज्ञातिबांधव निश्चितच म्हणतील – जर देवीची कृपा वगैरे असे काही खरेच असते तर तिने हा अपघातच होऊ दिला नसता. याला माझे स्पष्टीकरण असे आहे – शास्त्रांत सांगितल्याप्रमाणे प्रत्येक प्राणीमात्राला त्याच्या जन्मजन्माचे कर्माचे भोग भोगल्याशिवाय सुटकाच नाही. जर तुम्ही केलेल्या कुकर्माबद्दल, या जन्मात जर तुमचा पाय पूर्णपणे गमाविण्याची शिक्षा जर विधात्याने तुमच्या नशीबांत लिहिली असेल तर या देवीकृपेने तुम्हाला, त्याच पायाला, फक्त काटा टोचेल वा थोडीफार जखम निश्चितच होईल. कर्माचे भोग टाळणे कोणालाही शक्य नाही पण त्याची दाहकता, तीव्रता देवीकृपेने खूपच कमी होऊ शकते.

शाळा कॉलेजांत आणि नंतर सुद्धा गणित हा माझा अगदी आवडीचा विषय ! आणि मी नम्रपणे सांगू इच्छितो की, कुठलाही गणित प्रेमी केवळ भावनेच्या आधाराने निर्णय घेऊच शकत नाही. अंध विश्वासास त्याच्या जीवनांत अजिबात स्थान नाही. शिवाय त्याच्या नजरेत २+३=५ च ! ४.९९ किंवा ५.०१, पाच च्या कितीही जवळ असले तरी ते त्याच्या दृष्टीने चूक उत्तर आहे आणि तो त्याला शून्य गुणच देईल. मला काय म्हणायचे आहे हे तुमच्या नीट लक्षांत आले असेलच.

**अरुण भास्कर कसबेकर**
**९८२०२ ९१३६५/८७७९९८६६०६**
**arunkasby@gmail.com**

## प्रतिक्रिया

# वार्षिक संमेलनातील प्रमुख पाहुणे श्री. अरूण कसबेकर यांचे भाषण (१)

वर नमूद केलेले श्री. कसबेकर यांचे भाषण वाचले. प्रत्येक/अनेक ज्ञातिबांधव / ज्ञातिभगिनींच्या मनात असलेली खदखद / कळकळ / निषेध श्री. कसबेकर यांनी स्पष्ट व स्वच्छ शब्दात व्यक्त केले आहेत. त्यानंतर मांडलेल्या प्रतिक्रियाही बोलक्या आहेत. मृदुला भांडारकर यांच्या म्हणण्याप्रमाणे 'या प्रथा क्लेशदायक असल्यातरी आपण त्या सहन करत आलो आहोत ?' (म्हणजे पुढे कित्येक वर्षे त्या अशाच सहन करावयाच्या का ? त्या म्हणतात 'हे सर्व स्वामी व देवस्थानची कार्यकारिणी ठरवत आली आहे. तेव्हा या तक्रारींचे निवारण त्या कार्यकारिणीचे व तिन्ही मठांच्या स्वामींनी ठरवणे उचित होय.' (इतकी वर्षे जाऊनही बदल झाला नाही. तेव्हा हा बदल करावयाचे मठाधिपती आणि कार्यकारिणी कधी ठरवणार ?)

याच मुखपत्रिकेत मंजिरी मनोज कुलकर्णी यांनीही आपले विचार मांडले आहेत. त्यांनाही या जुन्या अनिष्ट प्रथांना मोडीत काढावयाचे धाडस कोणीतरी दाखवावे असे वाटते.

आताच आमच्या पुढच्या पिढीतील मुले / नातवंडे श्री. कसबेकर यांनी नमूद केलेल्या प्रथा / प्रायश्चित यामुळे मख्ख होऊन आपल्याच देवतांकडे पाठ फिरवीत आहेत. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे स्वामी विवेकानंदांनी शिकागो येथील परिषद गाजवली त्यांना प्रायश्चित घेण्याची गरज वाटली नाही. मग आमचेही कर्तृत्त्व थोड्याफार प्रमाणात तसेच नाही का ? प्रायश्चित्ताचा घोळ कशासाठी ? म्हणूनच मला असे वाटते की देवस्थानातील कार्यकारिणी आणि मुख्यतः स्वामींनीही ही उदासीन वृत्ती सोडून /टाकून आतातरी पुढाकार घेऊन या प्रथा मोडीत काढाव्या व देवालये/ श्रद्धास्थाने, या अनिष्ट व जुन्या प्रथांतून मुक्त करावी.

मुद्दा क्रमांक ५ मध्ये नमुद केलेल्या मठाच्या प्लॉटबद्दल : हे वाचल्यावर सर्व भयानकच वाटले. श्री. कसबेकर यांनी स्वतः पुढाकार घेऊन मदत करण्याची तयारी दाखवली आहे. तेव्हा हा त्यांचा मदतीचा हात मठाधिपती आणि कार्यकारिणीने स्वीकारावा हे उचित ठरेल.

पूजा, प्रवेश इत्यादीबद्दल जर कुटुंबाने परजातीय मुलगा/मुलगी जावई / सून म्हणून स्वीकारली असेल तर स्वामींनी आणि ज्ञातीच्या कार्यकारिणीनीही आंतर्जातीय विवाहाच्या मुला/ मुलींना, जावई जून व त्यांच्या मुलांना आपल्या ज्ञातीतीलच एक असे मानावे व या पूर्वीच्या चुकीच्या परंपरेतून / पायंड्यातून मुक्त करावे.

मी स्वतः ८० वर्षाची आहे. गोव्यात गेल्यावर तीनही देवालयांमध्ये पतीराजांसमवेत जात होते. माझ्या सुना ज्ञातीतीलच आहेत. त्यामुळे कोणत्याच प्रश्नाला सामोरे जावे लागले नाही. एकदाच आम्ही दोघांनी पूजा केली. त्यानंतर मी तिथे गेलो तर दानपेटीत मला पाहिजे ते टाकले देवीचे स्वरुप पाहिल्यावर माझ्या मोठ्या आईला / देवीमातेला, पित्याला भेटण्याचे

समाधान मला मिळाले व ते मला पुरेसे वाटले. परंतु त्याचवेळी कोणीतरी पालक / तरुण मंडळी श्री. कसबेकरांनी उपस्थित केलेल्या मुद्यांवरुन, हिरमोड झाल्यामुळे देवळातील पुजाऱ्यांबरोबर वाद घालत असताना ऐकल्यावर त्यांच्याबद्दल वाईट व सहानुभूती वाटली. माझ्यासारख्या अनेक जणांची अशीच मते असतील; त्यांच्याही मनात श्री. कसबेकर यांनी व्यक्त केलेली खदखद असेल म्हणूनच पुन्हा एकदा सांगावेसे वाटते की जुन्या परंपरा मोडीत काढून मठाधिपती व कार्यकारिणीने मोठे मन करुन ज्ञातिबांधवांना/ भगिनींना व लेकरांना दिलासा द्यावा हे सांगण्यासाठी हा पत्रप्रपंच केला आहे. तरी कृपया गैरसमज नसावा.

**सौ. कीर्तिलता शां. भांडारकर, स्लेटर रोड**
**०२२- २३८०६३३८**

## (२)

मागील अंकातील श्री. कसबेकरांच्या लेखामुळे मलाही श्री. शांतादुर्गा आईच्या कृपाप्रसादाचे मला आलेले अनुभव सांगावेसे वाटले. सर्वांनाच तिच्या कृपेचा अनुभव आला असणारच कारण ती जगन्माता आहे.

माझ्या घरच्यांच्या व माझ्या आजारपणातून तिने आम्हाला बाहेर काढले. तसेच अडचणीतही ती कोणाला ना कोणाला पाठवून आमच्या अडचणी दूर करते. फक्त तिचे स्मरण करणे एवढेच. मागच्या वर्षी कवळ्याच्या तिच्या देवळात माझ्या बाबतीत १-२ अशा घटना घडल्या की मीच आश्चर्यचकित झाले.

आमच्या लग्नाच्या ५० व्या वाढदिवसासाठी आम्ही कवळ्याला गेलो होतो. १ दारी - २ दारी पूजा करायचे मनात होते. पण ही पूजा मिळणे कठीण असते हे सर्वांनाच माहीत आहे. कारण या पूजा आधी ठरतात. पण आश्चर्य म्हणजे कोणीतरी ही पूजा रद्द केली व आम्हाला विचारण्यात आले. मी लगेच होकार दिला-पूजा व साडीही आमचीच नेसवली. मला तर फारच आनंद झाला. कारण खऱ्या अर्थाने देवीनेच आमचा लग्नाचा वाढदिवस साजरा केला.

दुसरी घटना डिसेंबर मध्ये माझा ७५ वा वाढदिवस तिथे करण्यासाठी आम्ही गेलो आणि माझ्या वाढदिवसा दिवशीच अभिषेक करायला मी एकटीच होते. पुजारी व मी दोघेच गाभाऱ्यात या गोष्टीचे मला आश्चर्य वाटले. कारण नेहमी अभिषेकासाठी नंबर लावावा लागतो. साडीसाठी मी आधीच बुकिंग केले होते. पण देवीनेच माझा वाढदिवस साजरा केला असे मला वाटले. शेवटी 'श्रीची इच्छा' आणि तिसरी घटना म्हणजे 'मखरोत्सव' हा माझा लेख बरोबर दसऱ्याच्या दिवशीच (१८ ऑक्टो.) ला म.टा. मध्ये छापून आला हे तिच्या इच्छेशिवाय कसे घडले असते ?

असो ती आईच्या मायेने चुका पदरात घेऊन सर्वांचा सांभाळ करते हे नक्की.

**सौ. सुहासिनी-बोरकर-वर्टी, जोगेश्वरी (पूर्व)**
**९६१९२७६७८३**

# आपण लग्नाला का जातो ?

चांगल्या भोजना करता ? कमी वेळात खूप नातेवाईक भेटतात म्हणून ? आपल्या व रिटर्न गिफ्टची तुलना करण्यास ? असो, हे सर्व आपल्यांस फार जवळच्या नसलेल्या व्यक्तींशी फक्त एक सोशल Bonding असलेल्यांशी असू शकते, पण जेथे आपल्या फार जवळच्या व्यक्तीं मध्ये आपण लग्नास जातो, तेव्हा आपली सदिच्छा व आशीर्वाद नवविवहितांचा संसार सुखाचा होवो हीच असते.

आजकाल खूप वेळा ह्या विरुद्ध, संसार सुरु होताच त्यांस तडा जाऊन घटस्फोटापर्यंत अथवा जीव देण्यापर्यंत पाळी आलेली असते. असे का ?

लग्न संस्था ही 'कुटुंब' जे की समाजाचे मूळ घटक आहे त्या करता अत्यंत महत्त्वाची आहे. 'लग्न' हा शब्द 'लगन' म्हणजे एक ओढ ज्यांत प्रेम, समर्पण, आदर, पारदर्शिता व ह्या बरोबर अनेक सद्भावनांचा समावेश असलेल्या गोष्टी, नवरा–बायको, सासू–सासरे, सून–जावई, नणंद–भावजई, विहीण–व्याही ह्या सर्व संबंधात असली पाहिजे. हे एक आदर्श आहे, पण असे नसले तरी नवरा–बायकोत तर असलीच पाहिजे. नवरा–बायकोत पर्यंत माझे दोन हात होते, आता चार हात झाल्यावर मी माझ्या समोर आलेल्या सर्व प्रेमाची खरी व्याख्या काय तर ती की आज समस्यांचा सामना करुन समाजांस एक आदर्श कुटुंब देईन ही असली पाहिजे. तर असे न होण्याची कारणे ही की लग्न ते love / Arranged असो त्यांत १) खोट्या गोष्टींचा समावेश २) एकमेकांच्या कुटुंबीयांविषयी आदर नसणे ३) चित्रपटात दाखवल्या प्रमाणे सर्व होणे ही इच्छा ४) संपत्ती प्रति फार लालसा ५) तोंडात गोडी नसणे इत्यादी आहेत.

ह्या विपरीत जर अत्यंत प्रामाणिकपणे मुलगा–मुलगी व त्यांचे कुटुंबीय वागतील तर संसार सुखाचा होईलच. तसे दुर्भाग्याने न झाले असल्यास आपण ज्या व्यक्तींशी लग्न केले आहे त्या व्यक्तीला सुखी करण्याची जबाबदारी आपली आहे ही असली पाहिजे.

संपत्ती, शिक्षण ह्यांत काही खोटे असल्याचे लग्नानंतर कळले, तरी मी माझ्या 'हार' ला हार न मानता 'जीत' करीन ही भावना असली पाहिजे. लग्नानंतरचे काही वर्षे एक नशासा असतो ज्यांत गृह कलह, सासू–सूनांची भांडण व अशा अनेक गोष्टीमुळे घरांत पाय पडताच स्वर्गात आले असे वाटत नाही. ह्याची वाण जर पक्ष–विपक्षाची भावना ठेऊन वाटली तर खात्री ठेवा की काही अत्यंत जवळच्या व्यक्ती सोडल्या तर बाकी सर्वास चटपटी–मसालेदार खबर हीच असते. आजच्या आपा–धापीच्या युगात दुःख वाटल्यास कमी व सुख वाटल्यास वाढते हे खरे नाही. तुम्ही खाली पडला तर केव्हा टाळ्या वाजवायला मिळतील ही भावना जास्त असते.

दोन विभिन्न परिसरांत वाढलेल्या व्यक्ती गृहस्थ जीवनात बरोबर चालतात, तेव्हा त्यांनी हा जीवन प्रवास 'समझौता एक्सप्रेस' मध्ये प्रेम, समर्पण, कष्ट, आदर, तोंडात गोडी

अशा नाश्ता बरोबर केला तर सर्व हम–सफर (नवी व जुनी पिढी) गृहसौख्य काय असते ह्याचा अनुभव घेऊ शकतील.

उपवर मुला–मुलींनी पण लग्न केवळ Social Status मिळते म्हणून, शरिरीक सुख मिळते म्हणून, दागिने कपडे मिळतात म्हणूनच नव्हे तर समाजास एक आदर्श कुटुंब देणार ह्या प्रेमाच्या व जबाबदारीच्या भावनेने केले पाहिजे. तसेच आपण लग्नांस का जातो तर लग्नास आलेल्यांची पण ही जबाबदारी आहे की नवरा–बायको सुखी नाही व नवविवाहितांच्या संसारात थोडी डगमग होत असल्यास चटपटी मसालेदार खबर समजून Gossip न करता चूप रहा व त्यांत काही सुधार होईल असे करता आले तर करा कारण तुम्ही त्या लग्नास एक साक्ष म्हणून उपस्थित होता.

धन्यवाद!

**ज्योती दीपक तेलंग, बंगळूर**
**०८०-२३४६१४०७**

## विजूले चुटकुले

टीचर : हातुळण पळौन पाय पसरचे ही म्हण इग्लीशांत सांग पळव्या

सुरेश : स्प्रेड युवर तंगडी ॲज पर घोंगडी

---

टीचर : आकाश्यातली वीज आणि घराची वीज हांतूत किते फरक आसा?

सुरेश : आकाश्यातल्या वीजेक बील येना घरातल्या वीजेक बील येता

**विजय सदानंद वागळे, ठाणे**
**९२२१६०७५७७**


**SHREE HOMOEOPATHIC PHARMACY**

**Wholesale & Retail For :**
**Genuine Indian & Imported Homoeopathic Medicines**

Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane, Matunga (West), Mumbai - 400 016. Tel. : 2438 3092 / 2430 9035 Mob. : 98694 83433
Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**

**Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.) , Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)**

## गणेशोत्सव मंडळ, सरस्वती बाग, जोगेश्वरी
## पर्यावरण स्नेही सजावटीबद्दल प्रथम पारितोषिक
(तपशील पृष्ठ क्र. ५)



**पर्यावरण मंत्री रामदास कदम यांच्या हस्ते वितरण**

डावीकडून १. संजय भुस्कुटे (टाईम्स), २. जयेश कामत३. अभिजीत कामत,
४. ई रवीन्द्रन (पर्यावरण अधिकारी), ५. रामदास कदम ६. प्रशांत (बाळा) कसबेकर
७. अरुणा कसबेकर ८. अतुल वर्टी ९. शांता पालेकर



गणेशोत्सव २०१८




पारितोषिक

## ठाणे मंच सहल
## (तपशील पृष्ठ क्र. २७)

(तपशील पृष्ठ क्र. २७)





## कारवारी आनंद मेळावा

(तपशील पृ. ३२)





ठाणे महिलांचा गाळा

## 'सुरभी', ठाणे मंचचा पुण्यातील कार्यक्रम

(तपशील पृ. २१)



दीप प्रज्वलन करतांना : १ उमेश तेलंग, २. सुरेश पालेकर, ३. मोहन दिवेकर
४. राजेश (किरण) दिवेकर ५. लता नायर


www.kccgoa.in
कोमल हिरवी तृणपाती ही
अलगद झुलवी सर्वांग,
कोवळ्या सुवर्ण प्रकाशात
उजळून जाई आनंद
अप्रतिम निसर्गाने नटलेलं
सुखसमृद्धी
मंगेशाच्या देवळापासून 2 मिनिटांच्या अंतरावर,
मंगेशी, फोंडा- गोवा
मनाला भुरळ घालणारं गोव्याचं आल्हाददायक सृष्टीसौंदर्य, प्रदूषणविरहीत हवा, खळाळणारं पाणी आणि सोबत मंगेश, म्हाळसा, नृसिंह, नवदुर्गा अशा देव-देवतांच्या सान्निध्याने पवित्र झालेला परिसर याने नटलेला आमचा नवा प्रकल्प 'सुखसमृद्धी' म्हणजे नावाला साजेसं असं सुख, समृद्धी आणि मांगल्याचं वरदान ठरेल हे नक्कीच. निसर्गाच्या सान्निध्यात राहून मन:शांति मिळविण्यासाठी आजच आमच्याशी संपर्क साधा.
फ्लॅटस् उपलब्ध: 1 रुम किचन, 1 बी.एच्.के, 2 बी.एच्.के
प्रॉजेक्ट मान्यता: गोवा टाउन प्लॅनिंग
कर्जसहाय्य: नामवंत वित्त संस्था
a Project by:
कुणाल कन्स्ट्रक्शन कंपनी
मुंबई ऑफिस: श्री. उमेश केरकर, 401, चौथा मजला, व्योम आर्केड, युनायटेड इंक कंपनीच्या बाजूला,
सुभाष रोड, विलेपार्ले (पू), मुंबई- 400057. टेलि:2683 3841/47/72. मोबा: 98336 36451
फॅक्स: 2683 3872 ई-मेल: kunalconstructiongoa@yahoo.in GOA RERA NO: PRGO05180314
गोवा ऑफिस: टी- 1, रॉयल हाऊस, काझीवाडो, फोंडा- गोवा. मोबा: 98209 33352, 98206 33321
गोवा साईट: 95/1, वेलिंग, मंगेशी, म्हार्दोळ, फोंडा- गोवा

# कवळें (गोवा) येथील श्री शांतादुर्गा मखरोत्सव

## (१८ ऑक्टोबर २०१८ रोजी 'महाराष्ट्र टाईम्स' मध्ये आलेला लेख)

गणेशचतुर्थीनंतर सर्वत्र आश्विन शुद्ध प्रतिपदा ते नवमीपर्यंत येणाऱ्या नवरात्रोत्सवाचे वेध लागतात. ठिकठिकाणचा नवरात्रोत्सव वेगवेगळ्या पद्धतीने साजरा करतात. काही ठिकाणी गरबा खेळून तर काही ठिकाणी घागऱ्या फुंकून साजरा करतात. पण गोव्यात मात्र नवरात्र हा 'मखरोत्सव' म्हणून साजरा करतात. 'मखर' म्हणजे श्री चा झोपाळा. येथील जवळ जवळ सर्व देवळात श्रींच्या चौकावर मोठा झोपाळा लावतात व रात्री वेगवेगळ्या रूपात सजवलेली मूर्ती झोपाळ्यावर ठेऊन झोके देत देत आरती करतात. कवळें येथील श्री शांतादुर्गेचा हा उत्सव पाहण्याचा योग मला आला व तो पाहून माझे डोळे दिपून गेले.

कवळें येथील मखरोत्सव नक्की कधी सुरु झाला याची माहिती उपलब्ध नाही. पण इथल्या मंदीर स्थापनेला ४५० वर्षे झाली. त्यामुळे साधारण ३००/३५० वर्षापासून ही प्रथा सुरु असावी. ९ दिवस भाविकांची गर्दी लोटलेली असते. देवळाच्या सभोवती बाहेर गांवाहून येणाऱ्या त्यांच्या महाजनांसाठी देवस्थान कमिटीने खोल्या उपलब्ध करुन दिल्या आहेत.

रोज रात्री १०.३० वा. वेगवेगळ्या वाहनातून (हंस, मोर, गरुड, वाघ, हत्ती, सिंह इ.) श्रीची मिरवणूक काढतात व नंतर आरती होते. संध्याकाळी ५ वाजल्यापासून पुजारी मखरात पौराणिक कथेवर आधारित देवीची अनेक रूपे सजवतात. प्रतिपदेला आसनावर बसलेली, द्वितीयेला पायावर पाय ठेऊन, तृतीयेला मांडीवर पाय ठेऊन (श्री लक्ष्मीस्वरुप) व चतुर्थीला मोरावर. श्रीचा मुख्य दिवस म्हणजे 'महापंचमी' या दिवशी रात्री सुवर्ण शिबिकेतून श्रीची मिरवणूक असते. त्यादिवशी मखरात हिमालयातील शिव-पार्वती करतात. अष्टमीला लाल शालू नेसलेली कमळात उभी असलेली लक्ष्मी मध्यभागी व एका बाजूस पांढरा शालू नेसलेली वीणा धारण केलेली व मोरावर बसलेली महासरस्वती व दुसऱ्या बाजूस मरुन शालू नेसलेली व सिंहावर बसलेली महाकाली व मध्ये श्री महागणपती हा देखावा म्हणजे साक्षात सर्व रूपे आपणास पहावयास मिळतात. नवमीला रात्री मखरात हातात भाला घेतलेली, सिंहावर लाल शालू परीधान केलेली व पायाजवळ महिषासूर पडलेला असे महिषासुरमर्दिनीचे रूप पाहिल्यावर खरोखर साक्षात महिषासुरमर्दिनीच अवतरली आहे की काय असा भास होतो.

रोज मखराची आरती रात्री ११ ते ११.४५ पर्यंत असते-वेगवेगळ्या तालावर, वेगवेगळ्या लयीत मखर हलवतात. मखराच्या आरतीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या आरतीसाठी बायका तेलात वाती भिजवून घरुन आपआपली ताम्हने घेऊन आणून ठेवतात. सुरुवातीला साधारण ५० ताम्हने असतात. पंचमी व नवमीला १०० ते १२५ पर्यंत ताम्हने असतात. पुरोहित सर्व ताम्हने घेऊन आरती करतात. मुख्य मूर्तीकडे (गाभाऱ्यातील) तोंड

जाणार नाही अशी खबरदारी घेऊन मखर तिन्ही बाजूने झोके देत फिरवतात. तेव्हा तर श्रीची मूर्ती आपल्याकडेच येते असा भास होतो. मखर फिरवण्यास २-३ माणसे असतात. इतकी सर्व ताम्हणे हाताने फिरवून आरती करण्यासाठी त्या पुजाऱ्यांना देवीच शक्ती देते असे वाटते. आरतीनंतर प्रसाद वाटप झाल्यावर मखरावर पडदा घातला जातो. मगच लोक घरी जातात. महानवमीला हा मखरोत्सव संपतो.

दसऱ्याला सकाळी घटविसर्जन करतात. दुपारी १ वाजता महाआरती होते व दुपारी ३.३० वा. श्रीची स्वारी मोरावर बसून रौप्यशिबिकेत (चांदीची पालखी) बसते. पालखीतल्या देवीची आरती होऊन घटविसर्जन केलेले नवधान्य लोकांना वाटतात. नंतर पालखी मिरवणुकीला प्रारंभ होतो. संपूर्ण गावातून ही पालखी फिरते. रस्त्या-रस्त्यावर रांगोळी, पताका, फुलांच्या माळा, पणत्या लाऊन लोक घराच्या दारात राहून स्वागत करतात. पालखी दारात उभी रहाताच बायका तिची ओटी भरतात. व श्रीचा कृपाप्रसाद घेतात. तसेच हे लोक पालखी सोबत असलेल्या लोकांना व पालखी वहाणाऱ्यांना खाण्यापिण्याचीही व्यवस्था करतात. नंतर पालखी आपट्याच्या झाडाकडे येते. तेथे श्रीची व आपट्याच्या झाडाची आरती करुन आपट्याची पाने सोने म्हणून लुटतात व एकमेकांना देतात - प्रसाद वाटप झाल्यावर पालखी पुढे श्री कपिलेश्वर, श्री वेताळ देव व पुढे कवळे मठात घराघरातील पूजा व ओटी घेत येते. तोपर्यंत रात्रीचे १० वाजलेले असतात-मठात पूजा, प्रसाद इ. झाल्यावर वाटेतील देवस्थानच्या भटजींच्या घराघरातून पूजा, ओटी घेऊन नंतर देवळाभोवती फिरते. तेथील खोल्यांमध्ये रहाणारे भक्तगण श्रीची ओटी भरतात नंतर पुजारी आरती करुन नारळ ओवाळून टाकतात व पालखी देवळात येते. तोपर्यंत रात्रीचे १२ वाजून जातात. नंतर सामुदायिक प्रार्थना, गाऱ्हाणे व प्रसाद वाटप होऊन निरोप दिल्यावर हा उत्सव पूर्ण होतो. संपूर्ण पालखीचा प्रवास ५/६ मैल असतो.

खरोखर हा अप्रतिम असा उत्सव प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय त्याच्या भव्यतेची कल्पना येणार नाही. प्रत्येकाने निदान एका दिवसाचा तरी हा उत्सव 'याचि देही याचि डोळा' पहावा.

**(कमाविसदार व पुरोहित यांच्या सौजन्याने विशेष साहाय्य श्री. गौरीश गायतोंडे व श्री. शांताराम सरज्योतिषी)**

**सौ. सुहासिनी अरविंद वर्टी, जोगेश्वरी (पूर्व)**
**९६१९२७६७८३**

# ठाणे मंच वार्षिक सहल

नवीन वर्ष चालू झाले की ठाणे मंचचा पहिला कार्यक्रम म्हणजे १ दिवसाची वार्षिक सहल.तर या वर्षाची सहल दिनांक २० जानेवारी २०१९ रोजी वज्रेश्वरी रोड जवळ 'सी–गल रिसोर्ट' येथे आयोजित केली होती. माहीम, जोगेश्वरी व मुलुंड ठाणे येथून ३ बसेस भरुन सकाळी ७.३० वाजता सुटल्या. वाटेत इडली चटणी व चहाचा आस्वाद घेत मजेत प्रवास चालू झाला. चहा घेतल्यामुळे सर्वांना तरतरी आली व अंताक्षरी खेळण्यात रिसोर्ट कधी आले ते कळलेच नाही. साधारणत: ९.३० वाजता ठाणेची बस पोहोचली नंतर अर्धा तासाच्या अंतरानी दोन्ही बसेस येऊन पोहोचल्या नंतर चमचमीत नास्ता घेऊन सर्वजण सुशेगाद झाले.

सर्व उपस्थितांना एकत्रित बसवून श्री. सुरेश पालेकर यांनी ठाणे मंचाचे कमिटी सभासद किरण दिवेकर, दुर्गादास रेगे व अरुण वाघ यांची ओळख करुन दिली. त्याचप्रमाणे देवदास नाडकर्णी व प्रसाद गायतोंडे यांनी अनुक्रमे माहीम व जोगेश्वरी येथून ज्ञातिबांधवाना सुखरुपपणे रिसॉर्टला बसने आणण्याची जबाबदारी घेतली याचा आवर्जून उल्लेख केला.

त्यानंतर वज्रेश्वरी देऊळ पाहाण्यासाठी एक बस सोडण्यात आली व काही जणांनी तिथेच राहाणे पसंत केले. उपस्थितांपैकी काहीजणांनी Swimming Pool वर पोहोण्याचा आनंद लुटला तर काहीजण Rain Dance वर धावले. राहिलेले एकत्र बसून नाच गाण्यात मश्गुल झाले. उपस्थितांपैकी आशा वाघ, हेमा कुलकर्णी, तेजश्री कुलकर्णी, मेधा सोहोनी, मंजिरी वेदविख्यात, ज्योती सुखटणकर, अनुराधा दळवी, रवी बोरकर या सर्वांनी त्यांच्या सुमधुर आवाजात गाणी पेश केली. गंमत म्हणजे ही गाणी चालू असताना रिसॉर्टवर दुसऱ्या ग्रुपमधले एक गृहस्थ ढोलकी घेऊन आले व त्यांनी आणि सतीश वागळे यांनी बासरी वाजवून सर्व गाण्यांना साथ दिली व वेगळीच मजा सर्वांनी अनुभवली. नंतर सतीश वागळे यांनी नेहमीप्रमाणे बासरीवर दोन गाणी पेश केली. प्रथम वागळे यांने 'भाग्यद लक्ष्मी बारम्मा' हे कन्नड गाणे गाऊन सर्वांची वाहव्वा मिळविली तसेच झुम्बा डान्स व लोकमान्य टिळक यांची नक्कल आवेशपूर्ण पेश केली. मेधा सोहोनी, तेजश्री कुलकर्णी, शुभांगी वागळे, संध्या पै, किरण दाभोळकर, प्रसाद गायतोंडे या सर्वांनी मिळून 'लडकी आँख मारे' व 'झिंगाट' या गाण्यावर अप्रतिम ग्रुप डान्स करुन मजा आणली.

सुग्रास पदार्थाबरोबर चिकन मसाला व श्रीखंडपुरीचा आस्वाद सर्वांनी घेतला. जेवणानंतर सर्वात लहान मुलांपासून ते सर्वात जेष्ठ अशा तरुणांपर्यंत सर्वांनी संगीत खुर्चीत भाग घेतला. महिला गटात पहिले पारितोषिक सागर वागळे यांना मिळाले तर सर्वात छोटा बच्चा कुमार त्रिनय पाईन याने दुसरे पारितोषिक मिळविले. संगीत खुर्चीनंतर सर्वांनी उस्फूर्तपणे गरबा डान्स केला. त्यानंतर देवदास नाडकर्णी यांनी 'गळफास' हा शेतकऱ्यांच्या जीवनावरचा 'हृदयस्पर्श' लेख वाचून दाखविला व दोन कविता म्हटल्या. विद्या वागळे यांनी आईची महती

सांगणारा लेख वाचून दाखविला व दोन कविता म्हटल्या. विद्या वागळे यांनी आईची महती सांगणारा लेख वाचून दाखविला की जो त्यांनी ग्रंथालीतर्फे 'आई' या विषयावर लेखन स्पर्धा आयोजित केली होती त्यात त्यांनी भाग घेऊन या लेखाला कीर्ती कॉलेजने उत्कृष्ट लेख म्हणून गौरविण्यात आला होता. तसेच आईवरती कविता वाचून दाखविली या लेखाने सर्वांची मने हेलावून गेली. सुरेश वागळे यांनी 'भाजीपाल्याचे लग्न' ही खुशखुशीत कविता वाचून सर्वांचे मनोरंजन केले. सुरेश पालेकर यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना स्वत:ची ओळख करुन देण्यास सांगितले. नंतर दुर्गादास रेगे व तारामावशी यांच्या हस्ते स्पर्धेत भाग घेतलेल्या विजेत्यांचे व कार्यक्रमात भाग घेतलेल्या कलाकारांना बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले. सुरेश पालेकर यांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी १ दिवस राहाण्याचे शिबिर एप्रिलच्या शेवटच्या आठवडा किंवा मे महिन्याच्या पहिल्या आठवडा या दरम्यान ठेवण्यात येईल असे जाहीर करताच त्यास उपस्थितांनी स्वागत करुन काही जणानी नावे दिली नंतर संध्याकाळी ५ वाजता भजी व चहाचा आस्वाद घेऊन परतीच्या प्रवासास सुरुवात केली.

दरवर्षी सर्वांनी ठाणे मंचच्या सहलीस व वेळोवळी होणाऱ्या कार्यक्रमास सहभाग घेऊन आनंद द्विगुणित करावा अशी विनंती.

**सुषमा सुबोध मुळगावकर**
**९८१९८३६४७६**

**गोमंतकाचे मुख्यमंत्री मनोहर परीकर कर्करोगाच्या उपचारासाठी अमेरिकेत ज्या इस्पितळात दाखल झाले होते त्याचे संचालक आहेत कर्करोग तज्ज्ञ डॉ. एकनाथ देव. डॉ देव हे कारवारचे रहिवासी होते व तेथील हिंदू हायस्कूलच्या १९६१ च्या तुकडीचे विद्यार्थी होते.**

**(सौ. मीरा तेलंग प्रभूवेर्लेकर लिखित 'दै लोकमत' मधील पत्राच्या आधारे )**

## विवाह /वाङ्‌निश्चय

| | | |
|---|---|---|
| विराज निनाद गंडभीर, माहीम | व | शगुन ज्योतिन शहा, ताडदेव |
| निखीला मुकुंद (प्रसाद) नाडकर्णी, पारले | व | आदित्य अजय जोशी, मालाड |
| सोनिका सुधीर तेलंग, अंधेरी | व | राहुल प्रकाश नाबर, कलिना |
| मांगिरीश मिलींद वागळे, माहीम | व | तन्वी प्रमोद करंबेळकर, बोरीवली |
| तन्वी मंगेश(राजेश) वागळे, ठाणे | व | इंद्रजीत राजेन्द्र हिंगणे, पुणे |
| शंतनू नारायण (उल्हास) वागळे, बोरीवली | व | वैभवी कृष्णकुमार रेडकर, चुनाभट्टी |

# ठाणे मंचने पुण्यात आयोजित केलेला कार्यक्रम "सुरभी"

पुण्यातील आपल्या ज्ञातिबांधवांनी एकत्र यावे. त्यांचा, परस्पर परिचय व्हावा ह्या उद्देशाने ठाणे मंचच्यावतीने रविवार दि. १३/१/२०१९ रोजी 'सुरभी' हा विविध गाण्यांच्या मैफलीचा कार्यक्रम बेडेकर गणपती मंदिर हॉल, पौड रोड, पुणे येथे आयोजित करण्यात आला होता.

सुरुवातीला ठाणे मंचच्या श्रीमती लता नायर ह्यांनी उपस्थितांचे स्वागत केले व आपल्या ओघवती शैलीत कार्यक्रमाचे निवेदन केले. श्री. मोहन दिवेकर ह्या आपल्या समाजातील ज्येष्ठ व्यक्तीच्या उपस्थितीने व आशीर्वादाने ह्या कार्यक्रमास विशेष शोभा आली. वयाच्या ९२ व्या वर्षीही त्यांचा असलेला उत्साह व सर्वांबद्दल असलेली आपुलकी निश्चितच आनंद व प्रेरणा देणारी आहे. ठाणे मंचचे उपाध्यक्ष श्री. सुरेश पालेकर ह्यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. मोहनकाकांनीही छोटेसे सुरेख भाषण करुन सर्वांना आशीर्वाद दिले व आपले सर्वांचे कुलदैवत श्री मंगेश शांतादुर्गा त्यांच्या फोटोला हार घालून व दीपप्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरुवात करुन दिली.

हा कार्यक्रम आयोजित करण्यासाठी आर्थिक हातभार लावणाऱ्या पुण्यातील श्री. उमेश गुरुप्रसाद वाघ, श्री. उमेश शंकर तेलंग, श्री. सलील श्रीपाद नाडकर्णी व श्री. कृष्ण उर्फ अशोक विनायक गायतोंडे ह्यांचा सत्कार श्री. मोहनकाकांच्या हस्ते करण्यात आला. श्री. सलील नाडकर्णी काही कारणामुळे उपस्थित राहू शकले नाहीत. त्यांची अनुपस्थिती जाणवली.

नंतर श्रीमती लता नायर ह्यांनी ठाणे मंचच्या खास ह्या कार्यक्रमासाठी आलेल्या कार्यकारिणीच्या सभासदांची ओळख करुन दिली. श्री. सुरेश पालेकर ह्यांनी आपल्या भाषणात पुणेकर ज्ञातिबांधवांना आपल्या विचारांची प्रेरणा देऊन पुण्यातही असा "NKGSB मंच पुणे" स्थापन करुन नेहमी एकत्र भेटत रहाण्याचे व विविध कार्यक्रम करत रहाण्याचे आवाहन केले.

ह्यानंतर सर्वजण आतुरतेने वाट पहात असलेल्या "सुरभी" ह्या विविध गाण्यांच्या कार्यक्रमाची सुरुवात मुख्य कलाकार श्री. शशांक दिवेकर ह्यांच्या निवेदनाने झाली. त्यांनी प्रथम त्यांच्या सहकलाकारांचा परिचय करुन दिला. सलोनी बोरकर (गायिका) श्री. कुमार शेलडेवार (हार्मोनियम) श्री. पराग पांडव (तबला) व श्री. आदित्य आपटे (ताल वाद्य) व श्री. रोहन ढगे (ध्वनीयोजना) ह्यांनी साथ देऊन कार्यक्रम बहारदार केला.

श्री दिवेकर ह्यांनी 'माझे जीवनगाणे' ह्या गाण्याने कार्यक्रम सुरु करुन 'तिन्ही लोक आनंदाने भरुन जाऊ दे', 'दिवस तुझे हे फुलायचे' अशी सुंदर गाणी गात प्रेक्षकांचे मन जिंकले आणि सर्वजण त्यांच्या गाण्यांवर ठेका धरत धुंद होत गेले. सलोनी बोरकर हिने 'कजरा मोहब्बतवाला' ह्या उडत्या चालीच्या गाण्याने कार्यक्रमाला बहार आणली. तसेच 'बुगडी माझी

सांडली गऽऽ' ही लोकप्रिय लावणी ठसक्यात गाऊन वातावरण उत्साही केले. ह्या सुंदर लावणीला सर्व साथिदारांची विशेषत: तबल्याची उत्कृष्ट साथ मिळाल्याने लावणी फारच बहारदार झाली. शशांक दिवेकरनीही मग 'फुल गेंदवा न मारो' व 'मुधुबन में राधिका नाचे रे' ही गाणी गाऊन प्रेक्षकांना भाराऊन टाकले व टाळ्यांचा कडकडाट मिळविला वन्समोअरचा आग्रह होत होता पण वेळेअभावी ते शक्य नसल्याने त्यांनी रसिकांच्या आग्रहास्तव 'गझल' ची फर्माईश पुरी करण्यासाठी 'झुकी झुकीसी नजर' ही गझल गाऊन वातावरण भारुन टाकले. तसेच मदनमोहन त्यांच्या संगीताने नटलेले राग बागेश्रीमधील 'हमसे आया न गया' हे गाणे गाऊन व जुन्या गाण्यांना उजाळा देत म्हटलेले 'पिया मिलन को आना' हे गाणे गाऊन सर्वांना भूतकाळात नेले.

सलोनी बोरकरने पुन: एकदा 'झुमका गीरा रे बरेली के बाजार में' हे उडत्याचालीचे गीत गाऊन वातावरण तजेलदार केले तर शशांक दिवेकरने शंकर जयकिशन यांच्या संगीताने नटलेले राष्ट्रीय पुरस्कार मिळालेले 'छम छम बाजे रे पायलिया ' हे गाणे गाऊन धमाल आणली व रसिकांचे कान तृप्त केले. ह्या सर्व गाण्यांच्या ठेक्यावर तालावर तृप्त होऊन सर्वजण डोलत राहिले.

'रघुरायांच्या नगरी जाऊन गा बाळांनो श्री रामायण' ह्या भैरवीने 'सुरभी' ची सांगता झाली. कार्यक्रम संपू नये, असाच चालू रहावा असे वाटत असूनही अल्पोपाहार व चहा देऊन संपूर्ण कार्यक्रमाची सांगता करण्यात आली, ठाणे मंचतर्फे आलेल्या श्री. सुरेश पालेकर, श्री. राजेश दिवेकर, श्री. दुर्गादास रेगे, श्री. अरुण वाघ, व श्रीमती लता नायर ह्यांचे व ह्या कार्यक्रमासाठी ठाण्याहून मुद्दाम आलेल्या सर्वांचे विशेष आभार की त्यांनी पुण्यातील ज्ञातिबांधवांना एकत्र आणण्यासाठी, त्यांचा परस्पर परिचय करुन देण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. पुण्यातील ह्या कार्यक्रमाची सर्व व्यवस्था श्री. उमेश तेलंग ह्यांनी सांभाळली व हा कार्यक्रम यशस्वी करण्यास ठाणे मंचने खूप मार्गदर्शन व सहकार्य केले.

पुण्यात लवकरच "NKGSB पुणे मंच" ची स्थापना होवो, ही श्री मंगेशचरणी प्रार्थना.

**सौ. स्मिता उमेश तेलंग, पुणे**
**८४४६६१५०५८**

**दि एन्. के.जी. एस. बी. संघाच्या नव्या कार्यकारिणीची निवडणूक**
**संघाच्या सभासदांना सूचना**

संघाची कार्यकारिणी ही निवडून आलेले एक अध्यक्ष आणि आठ सभासद व दोन स्वीकृत सभासद अशा सभासदांची असते. संघाच्या सध्याच्या कार्यकारिणीची मुदत ३१ मार्च २०१९ रोजी संपत आहे. तेव्हा ज्या सभासदांना २०१९ ते २०२२ या तीन वर्षाच्या कालावधीसाठी अध्यक्ष वा कार्यकारिणी सभासद म्हणून काम करायचे असेल, त्यांनी संघाच्या कार्यालयातून छापील अर्ज घेऊन सूचक व अनुमोदक यांच्या सह्यांसकट अर्ज पूर्ण करुन दि. ३० एप्रिल २०१९ संध्याकाळी ५ वाजेपर्यंत कार्यालयात सादर करावेत.

**मुंबई मंच व ठाणे मंच – नव्या कार्यकारिणीची निवड**

मुंबई मंच व ठाणे मंच या उभय शाखांच्या कार्यकारिणीची मुदत ३१ मार्च २०१९ रोजी संपत आहे. पश्चिम व पूर्व उपनगरांत राहणाऱ्या ज्या सभासदांना २०१९ ते २०२२ या तीन वर्षाच्या कालावधीसाठी कार्यकारिणीवर सभासद म्हणून काम करावयाचे असेल त्यांनी आपली नावे ३० एप्रिल २०१९ पर्यंत अनुक्रमे खालील ठिकाणी सादर करावीत.

| **मुंबई मंच** | **ठाणे मंच : संपर्क** |
|---|---|
| संघ कार्यालय, गिरगांव | सुरेश पालेकर : २५३६४३२८ / ९९६९४५५३७० |

नियतकालिकांच्या रजिस्ट्रेशनबाबतीच्या नियमानुसार
**'नॉर्थ कॅनरा जी.एस्.बी. वृत्तविलास' त्रैमासिकाचे प्रकटन**
Form IV Rule 8

१. **प्रकाशन स्थळ :** दि नॉर्थ कॅनरा जी.एस्.बी. संघ, लक्ष्मीसदन, ३६१, व्ही.पी. रोड, मुंबई ४
२. **प्रकाशन अवधी :** त्रैमासिक
३. **मुद्रक, प्रकाशक आणि संपादक :** दत्तात्रय नागेश नाडकर्णी, **राष्ट्रीयत्व :** भारतीय
पत्ता : दि. नॉर्थ कॅनरा जी.एस्.बी. संघ, लक्ष्मीसदन, ३६१, व्ही.पी. रोड, मुंबई ४
४. **मालक :** दि. नॉर्थ कॅनरा जी.एस्.बी. संघ, लक्ष्मीसदन, ३६१, व्ही.पी. रोड, मुंबई ४

मी, दत्तात्रय नागेश नाडकर्णी, या निवेदनाद्वारे जाहीर करतो की वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा आहे.

**मुंबई, १ मार्च २०१९** **दत्तात्रय नागेश नाडकर्णी** – प्रकाशक

# मुंबई मंचतर्फे कारवारी आनंदमेळावा

प्राचीनकाळी समुद्रमंथनातून निघालेली अमृत, हलाहल आदि चौदा रत्ने देव आणि दानवांनी आपसात वाटून घेतली असे म्हणतात. परंतु सुरमई, पापलेट, बांगडा, तिसऱ्या आणि कोलंबी ही सागरी संपत्ती त्यांना कशी सापडली नाही कोणास ठाऊक. कालांतराने ती मानवजातीच्या गळाला लागली आणि त्याच्या उदरनिर्वाहाची व उदरभणाची साधन बनली. या संपत्तीची लयलूट कारवारकरांइतकी कोणीच केली नसावी. या मत्स्यरत्नांना मसाल्याच्या कोंदणात जडवून केलेले पदार्थ ही एक कारवारी खासियत. अशाच काही पदार्थांचा रसास्वाद आपल्या ज्ञातिबांधवांनी मुंबई मंचातर्फे दिनांक २७ जानेवारी २०१९ रोजी जोगेश्वरी येथील के. जी. एस. हाऊसिंग सोसायटीच्या पटांगणात आयोजित केलेल्या अकराव्या कारवारी आनंद मेळाव्याच्या निमित्ताने घेतला.

नेत्रदीपक रोषणाई, कल्पकरीत्या सजवलेले स्टॉल्स, खाद्यपदार्थांचा खमंग सुवास यांनी भारावलेल्या वातावरणाच्या पार्श्वभूमीवर सुकरुंडे, पातोळ्या, आप्पे, चवडे अशा शाकाहारी पदार्थांसह तिसऱ्याचे वडे, हळदीच्या पानातले बांगडे, सुक्या सुंगटाची किसमूर, कोलंबी मसाला, कोंबडी–वडे, कोलंबी भात, इत्यादी मांसाहारी खास पदार्थांची आकर्षक मांडणी पाहून खवय्यांच्या तोंडाला पाणी न सुटले तरच नवल. दाबेली, दहीवडे, शेवपुरी, पॅटीज यांची संगतही होतीच. हे सगळं खाऊन त्याचं उत्तम पचन झालं पाहिजे यासाठी सोबत सोलकढी, कोकम सरबत आणि तिवळ यांची सोय होती. इतकेच नव्हे तर स्वीट डिश म्हणून चॉकोलेट्स, केक्स यांसोबत यंदाचे खास आकर्षण ठरलेले गडबड आईस्क्रीमदेखील होते. रोजच्या आहारात आवश्यक अशा पापड, लोणची, सांडगे या घरगुती वस्तूंसोबत हस्तकलेतील अनेक मोहक कलाकृतींचे दर्शन घडवणारे स्टॉल्सही आकर्षित करत होते. त्यात तयार कपडे, पर्सेस, साड्या, इमिटेशन ज्वेलरी व गिफ्ट आर्टिकल्स यांचा समावेश होता.

आर्थिक प्रायोजकत्वासाठी आपली एन.के.जी.एस.बी बँक नेहमीप्रमाणे यंदाही पाठीशी उभी होती. बँकेचे चेअरमन श्री. किशोर कुलकर्णी यांनीही सपत्नीक उपस्थित राहून कार्यक्रमाची प्रशंसा केली. के.जी.एस.को. ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटीच्या कार्यकारिणी मंडळाने सोसायटीचे पटांगण या कार्यक्रमासाठी उपलब्ध करुन विशेष साहाय्य केले. त्याचप्रमाणे सारस्वत बँक, एस.व्ही.सी. बँक, इंडिअन फायर सेफ्टी सिस्टम यांनीही या कार्यक्रमासाठी मोलाचा हातभार लावला. या सर्वांचेच मुंबई मंचातर्फे आभार तसेच सर्व हजर असलेल्या खाद्यप्रेमींना व स्टॉलधारकांना हा वार्षिक कारवारी सोहळा यशस्वी केल्याबद्दल धन्यवाद.

**डॉ. विवेक कुलकर्णी, दादर**

| स्टॉलधारक | खाद्यपदार्थ / इतर जिन्नस |
|---|---|
| जयश्री भेडसगावकर | खिमा दाबेली, बास्केट शेवपुरी, सांबार मसाला, कडिपत्ता चटणी भाजणी पीठ, तीळ लाडू, लोणची, Homemade Soaps |
| विद्या कसबेकर | चिकन खिमा पॅटीज, मेथी भजी, पातोळ्या, चहा |
| आशीष शिरोळकर | कुंदा, करदंट, कडबोळी, बेळगावी साड्या |
| लक्ष्मी पै | लाडू, लोणची, पापड, सांडगे, इत्यादी |
| पंचमी वैष्णव/विदिता कबे | Chilly Kheema, Chicken Sandwich, Nachos |
| उमा वागळे/शुभदा कुलकर्णी | सुक्या सुंगटाची किसमूर, कोलंबी मसाला, मसाला पोहे, कोकम कढी (तिवळ), आंबोळ्या, चवडे |
| वैशाली दळवी | कोलंबी मसाला-घावणे, तिसऱ्याचे वडे, Sea-Food, मिसळ, Prawns Shots, सुकरुंडे |
| गिरीश कुलकर्णी/शकुन संझगिरी | गडबड आईस्क्रीम, चिकन खिमा पॅटीज, कोलंबी वडे |
| ओंकार कसबेकर | Home Decoration Products |
| देवीदास शेणॉय | कोंबडी-वडे, शेव, चिवडा, इत्यादी |
| मीनल नाडकर्णी | Chicken Curry, तवा पुलाव, Chocolates |
| निधी चव्हाण | Ladies Purses and Lucknowi dresses |
| संगीता सातोस्कर | गोवा व देवगड येथील प्रसिद्ध खाद्य उत्पादने |
| गंगा सुतार | कोलंबी पुलाव, कोलंबी लोणचे, सोलकढी, Chicken Cheese Balls |
| महेंद्र कसबेकर | Organic Food Products |
| किशोर बोरकर | मसाला पोहे, लिंबू सरबत, कोकम सरबत |
| उल्हास वांतेकर | दहीवडे, सुकरुंडे, Cheese Patties |
| नेहा नाडकर्णी | Artificial Jewellery |
| राघवी सडेकर | Cookies, Muffines, Cupcakes etc., पेरु व अननस सरबत |
| वंदना कामत | Kurtis and Artificial Jewellery |
| वरदा शिरसेकर | मेथी लाडू,मैदा चकली, आप्पे, Prawns Biryani,Chocolates |
| गौरी भाटकर | Ladies Purses and Bags, Artificial Jewellery |
| सागर तावडे | कोलंबी भात, सोलकढी |
| प्राजक्ता सहस्त्रबुद्धे | पिठांचे विविध प्रकार |
| ऊर्मिला कुशे | Saree Covers, Open Hangers, Variety of Organizers, Shoe Covers |
| विनीता पेडणेकर | चिकन बिर्याणी, Chicken lollipop, सोलकढी |
| जयश्री ठोमरे | Artificial Jewllery and Purses |
| सुलभा नाबर | खिमा पॅटीज, हळद लोणचे, Mutton Shahi Kabab, अळशी चटणी, Chocolates |
| ज्योती राव | Artificial Jewellery |

# SMT. INDIRA BABURAO TELANG - MY DEAREST AAJI

Do you believe in fairy godmothers? I do. Because I had one, my grandmother, Indira Telang. She did not have a magic wand but two magical hands! She would make whatever I wanted, do whatever I asked, no matter how busy she was. If I wanted a dress for my doll, she would make it. When I collected raspberries from the yard, she would make ice-cream from them. She would make my wishes come true.

I had the blessing of knowing her for nearly fourteen years. I have countless memories of family parties, Diwali festivals and summers spent at her house which filled my heart with happiness.

Over the past few days, I've thought a lot about my grandmother and the impact she had on my life, and the lives of all those she touched. After some serious reflection, I've pared down everything my grandmother has taught me into three core lessons that I hope to carry with me through the rest of my life, in her honour:

**1. Always help those less fortunate.**

My grandmother always searched for opportunities to help others whether it was volunteering at her Mahila mandal or teaching someone to knit, cook or paint. She was filled with joy when she was helping others.

**2. Find joy in the small moments.**

She was happiest when her brothers and sisters visited her, after all she did take care of her little siblings. She was always ready to paint or cook goodies for us. Her thought that she shared with me was while cooking was that it was very important to cook with happiness in your heart. That good feeling would be passed on in the food and whoever eats the food will definitely benefit with the good food.

On my way to her home, I used to pick flowers on the roadside, just to see the joy in her face.

**3. Trust in whatever you do.**

My grandmother was a spiritual person but at same time she did whatever made her happy as she believed in herself. She was a wonderful wife, sister, mother, grandmother and volunteer. She flawlessly balanced all aspects (knitting, embroidery, stitching, cooking, painting) of her life but also took good care of her family.

She was well respected in the community due to her helping nature. I was well known in the community as her granddaughter. One day I saw a beautiful flower that was quite high up. My first thought was to pluck that flower and give it to my grandma, she would love that. I tried a few times to reach the flower. Ultimately since I could not reach the flower I had to find something to

stand on to get it. I had my cycle and my friend along with me. So I told my friend that I would get on the cycle and try to reach the flower while she should hold the cycle tight from below. Well my hand reached the flower and I plucked it and when I looked down I saw the owner of the plant holding my cycle. My friend ran away and I thought the lady would scold me. She gave me a hand to get down from my cycle. Then she asked me if I was "Vahini's granddaughter", I said yes and there it was, my grandmother's name saved me. The lady told me she was my grandmother's friend and overloaded me with more flowers for my grandmother. I was just saved because of my grandmother.

I realized then what she meant to me and everyone she met. I hope to pass on her lessons and way of life to my daughters. Her spirit and memory will always be with me.

Ambika (Pranjal) Telang Desai. U.S.A
t.amabika@gmail.com

## REMEMBERING AJOBA

It's my maternal grandfather- M. D Shanbhag's, 100th birth anniversary this year!

We consider ourselves fortunate to have been able to celebrate his 95th Birthday with family and friends..memories of the special evening, 5 years ago, still so fresh in our hearts..

Mahabaleshwar Damodar Shanbhag (fondly known as "Mhabanna", "Papa"/"Papa Ajoba") was born to parents Manik and Damodar Shanbhag, in Shirali, on 01st March 1919, on the auspicious day of Mahashivratri. He was the 2nd amongst his siblings and the eldest son of the Shanbhag family.

He essayed several roles to perfection…from being Joint Secretary for Finance (State) to being offered a role to co-ordinate activities for Hindustan Petroleum PanIndia, post his retirement, apart from of course, being a disciplined elder brother and father, a supportive husband, a doting grandfather to us and even more soft and loving great grandfather to our generation next.

All through his life he was a God-fearing, disciplinarian, generous and humble human being, a strong support to his family, friends and even friends of friends. Those who came in contact with him, always received his helpful guidance and support.

He was a healer..with his words, his touch, his blessings and best wishes and of course not to forget, his homeopathy medicines (though an M.A. in English Literature, his interest and knowledge of Homeopathy was amazing!!)

He lived well till the age of 97, due to his disciplined attitude, complete faith and total subservience to the Almighty. In his last few years as well, what we could provide him was mere physical support, but what he provided us for years and

years together was strong moral and emotional support.Amongst the many things that he has given us, his spiritual legacy is probably something that we cannot thank him (and my Aaji) enough!

His opinions were very rational even in the 21st century and he was such a progressive thinker, always inquisitive and keen to learn. In his early 80's, he was enthusiastic to operate the ATM, learn about mobile phones, e-mails and internet.

His love for animals (pet/stray) and children (he never needed to know them to love them) was unparalleled.

My elder brother (Mandar) always says- "he was our "GOOGLE" long before the internet!"

There are so many things that he has given us through his teachings, his guidance and his Life, that if I sit to pen down all of that, words won't suffice or do justice to it. I am not a great writer and this is probably my 1st attempt at penning down what I feel, but I guess it's the "PAPA AJOBA" effect,that has made me express myself, so well.

He led by example and has given us plenty to try and emulate. We know that he is watching over us like a shining star from up there in heaven and his blessings will always be with us, in all walks of life.

WISH YOU A VERY HAPPY 100TH BIRTHDAY AJOBA!!! WE MISS YOU!!

-Dr. Madhura Jayprakash Desai

9833287137

## 'ज्येष्ठांसाठी पथ्यकारक आहार' - श्रीमती विद्या वागळे यांचे पाकशास्त्रावरील सहावे पुस्तक

माहीम येथील श्रीमती विद्या मोहन वागळे या पाकशास्त्रांत अत्यंत निपुण आहेत. खाद्यपदार्थ स्पर्धेच्या क्षेत्रांत त्यांना मिळालेल्या बक्षीसांची गणतीच नाही. कथा वाचन स्पर्धेतही त्या भाग घेतात व सलग तीन वर्षे त्यांना पारितोषिके मिळाली आहेत. विद्याताई यांनी आत्तापर्यंत पाकशास्त्रावर 'लज्जतदार कारवारी पाककृती', 'चटकदार मालवणी पाककृती', 'ए-वन ब्रेकफास्ट', 'खाऊचा डबा' व 'कॉन्टीनेंटल डिशेस' अशी पाच पुस्तके लिहिली आहेत. ही पुस्तके एवढी लोकप्रिय झाली की, काहींच्या पुनरावृत्याही झाल्या. अलीकडेच त्यांचे 'ज्येष्ठांसाठी पथ्यकर आहार' हे सहावे पुस्तक प्रकाशित झाले आहे. या पुंस्तकात न्याहारी, दुपारचे जेवण, मधल्यावेळचे खाणे, रात्रीचे जेवण, ज्यूस-ड्रिंक, सॅलड-सूप, चटकदार चटण्या व लोणची व मुखशुद्धी असे आठ भाग आहेत. त्याशिवाय आरोग्य टिप्स या प्रकरणांत उपयुक्त माहिती आहे.

**(विद्या वागळे, संपर्क : २४४४४४८७, ९८६७२५५९७७)**

# MANGSIDESH INVESTMENTS PVT LTD

402, Business Point, Paliram Road, Off S.V.Road, Behind Brahma Kumari Hospital,
Andheri (West), Mumbai 400 058
Tel No. 022-4233 2323/ 6584 1233/ 6523 8964/ 98337 22444




Can we help you to achieve your goal???

& your goal is...

Let's reach nearer

To your highest GOAL!!!

Step by step....




*A little every month grows to something significant over time!!!*

*Invest Rs.1000/- Per month & get...*

| Investment Years | Total Investment | Growth Rate 8% | Growth Rate 12% | Growth Rate 15% |
|---|---|---|---|---|
| 15 | 180,000 | 348,000 | 504,000 | 676,000 |
| 20 | 240,000 | 593,000 | 999,000 | 1,516,000 |
| 23 | 276,000 | 794,000 | 1,473,000 | 2,417,000 |
| 25 | 300,000 | 957,000 | 1,898,000 | 3,284,000 |
| 30 | 360,000 | 1,500,000 | 3,530,000 | 7,010,000 |
| 32 | 384,000 | 1,786,000 | 4,509,000 | 9,473,000 |
| 35 | 420,000 | 2,309,000 | 6,495,000 | 14,860,000 |




***Indian Equity market has given avarage 16% return s in last 32 year s..***

Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully before investing.

## लेफ्ट. कर्नल डॉ.रमाकांत वर्टी यांचे १०१ व्या वर्षी निधन

लेफ्ट. कर्नल डॉ. रमाकांत वामन वर्टी यांनी २९ नोव्हेंबर २०१८ रोजी शंकरी गाठली तेव्हां त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचा सत्कार करण्याचा आमच्या संघाचा मानस होता. पण त्यांच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे ते जमले नाही. तरीही मुखपत्रिकेच्या अंकातून त्यांच्या कर्तबगारीची माहिती वाचकांना करुन दिली होती व त्यांचे अभिनंदन करण्यांत आले होते. अलीकडेच १७ जानेवारी रोजी त्यांचे १०१ व्या वर्षी देहावसान झाले. त्यावेळी सेनादलाच्या डायरेक्टर जनरल ऑफ डेण्टल सर्व्हिसीस या लेफ्ट जनरलच्या उच्च हुद्याच्या अधिकाऱ्यांनी व्यक्तीशः दूरदर्शनवरुन कुटुंबीयांचे सांत्वन केले. तसेच मुंबईतील लेफ्ट कर्नलच्या हुद्यावरील एका अधिकाऱ्याने स्वतः घरी जाऊन डॉ. वर्टी यांच्या पार्थिवावर पुष्पगुच्छ अर्पण करुन सॅल्यूट केले. यावरुन डॉ. वर्टी यांना सेनादलात किती मान होता याची कल्पना येते. संघातर्फे डॉ. वर्टी यांना श्रद्धांजली.

## निधन

| | | |
|---|---|---|
| विमल गजानन बोरकर | (कडवाड) | माहीम |
| सुनील (मनोहर/पोपी) रामचंद्र देसाई | (कडवाड) | अंधेरी |
| लक्ष्मी मोहन देवनळ्ळी | (यल्लापूर) | पारले |
| *दिगंबर कृष्णराव देवनळ्ळी | (यल्लापूर) | पुणे |
| विजया (जया) दिगंबर देवनळ्ळी | (यल्लापूर) | पुणे |
| सुलभा बाळकृष्ण दुभाषी | (मखेरी) | पुणे |
| सुभाष (दीपक) महारुद्र कसबेकर | (खारगे) | ग्रांट रोड |
| प्रमिला विश्वेश्वर कसबेकर | (कडवाड) | अमेरिका |
| महादेव (म्हादी) अनंत कुलकर्णी | (अवर्सा) | दादर |
| सुधीर श्रीपाद मुझुमदार | (अंकोला) | डोंबीवली |
| दिलीप शंकर नाडकर्णी | (सावरपै) | गिरगांव |
| उज्ज्वला उमाकांत नाडकर्णी | (अंकोला) | ठाणे |
| शैला शाम नाडकर्णी | (सावरपै) | फ्लोरिडा |
| यशवंत (श्रीकांत) सदानंद पालेकर | (कडवाड) | कुडाळ |
| काशिनाथ शांताराम पालकर | (कडवाड) | अंधेरी |
| प्रशांत श्रीपाद पालेकर | (कडवाड) | वाशी |
| सरला विश्वेश्वर पिकळे | (अंकोला) | अंधेरी |
| *तारा दुर्गानंद फेणे | (चेंडीये) | जोगेश्वरी |

| | | |
|---|---|---|
| शालिनी वामन साखरदांडे | (हळगे) | सांताक्रुज |
| उमेश दत्तात्रय वाघ | (सदाशिवगड) | अंधेरी |
| दिनानाथ कृष्णराव वाघ | (सदाशिवगड) | मालाड |
| दुर्गा जयवंत (जया) वाघ | (सदाशिवगड) | पारले |
| मोहन विठ्ठल वागळे | (माजाळी) | माहीम |
| प्रभाकर (छोटु) पांडुरंग वागळे | (अस्नोटी) | गोवा |
| सुमन दिगंबर वागळे | (माजाळी) | दादर |
| विद्याधर (बाबुराव) वामन वागळे | (बाड) | बोरीवली |
| वसुंधरा (सुनंदा) घनश्याम वागळे | (माजाळी) | माहीम |
| रमाकांत वामन वर्टी | (बाड) | सांताक्रुज |

*दिगंबर देवनळ्ळी व तारा फेणे यांनी देहदान केलेले आहे.

## संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

**(मागील अंकानंतर)**

**उल्लेखनीय देणग्या**

### श्री शरद सलगर यांच्या स्मरणार्थ यंदाही १ लाख ५३ हजार रुपयांची देणगी

सदाशिवगड शाळेचे लोकप्रिय मुख्याध्यापक सलगर मास्तर यांचे चिरंजीव व टान्झानिया येथे ३५ वर्षे वास्तव्य करुन तेथे चांगले नाव कमाविलेले श्री. शरद सलगर यांचे २०१२ साली दु:खद निधन झाले होते. यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती रेखा सलगर प्रतिवर्षी पतीच्या स्मरणार्थ संघाच्या समाज सेवानिधीसाठी, वृध्दसेवा निधीसाठी व एज्युकेशन सोसायटीसाठी प्रत्येकी ५१ हजार रुपये याप्रमाणे एकूण १ लाख ५३ हजार रुपयांची देणगी देतात. यंदाही त्यांनी अशाच प्रकारची देणगी दिली आहे.

### जोगेश्वरी येथील 'सोसायटी'च्या 'वैनी' श्रीमती इंदिरा तेलंग यांच्या जन्म शताब्दीप्रसंगी वृद्धसेवानिधीसाठी एक लाख एक रुपयांची भेट

जोगेश्वरी येथील कारवारकरांची वसाहत असलेल्या सरस्वती बागेला 'सोसायटी'च म्हणतात. तेथील सर्व भगिनी ज्यांना अपुर्बायेने 'वैनी' म्हणायच्या त्या म्हणजे श्रीमती इंदिरा बाबुराव तेलंग, पूर्वाश्रमीच्या कृष्णाबाई मंजुनाथ (जिवमाम) वागळे. १९६१ साली 'एकमेका करु साहाय्य अवघे धरु सुपंथ' या उक्तीनुसार त्यांनी आपल्या हाताशी काही समविचारी भगिनींना घेऊन वनितावृंद ही संस्था स्थापन करण्यांत पुढाकार घेतला. सुरुवातीला घरोघरी, ओट्यावर, कधी गच्चीवर, तर कधी रामेश्वर मंदिरात त्यांच्या सभा होत. आता रामेश्वर सोसायटीच्या स्वत:च्या एका सदनिकेत सर्व कार्यक्रम होतात. ही सदनिका विकत घेण्यासाठी लागणारा निधी त्यांनी वर्गणी, नाटकाचे प्रयोग, आनंद बझार, प्रदर्शने, स्मरणिकेतील जाहिराती या द्वारे गोळा करण्यांत आला. त्यासाठी त्यांनी अतोनात श्रम घेतले ते ही निरागसपणे,

कुठल्याही प्रकारच्या प्रसिद्धीची अपेक्षा न करता.

सर्वगुणसंपन्न असे काहींना खोचकपणे म्हणतात. पण वैनी खरोखरचा तशा होत्या. भरतकाम, विणकाम, पाककला, चित्रकला, सजावट इत्यादी विविध कलाक्षेत्रांत त्या निपुण होत्या. आपल्या निसर्ग देणगीचा लाभ इतरांना विनामूल्य देण्यांतही त्या तत्पर होत्या. फेब्रुवारी १९९४ मध्ये ७५ व्या वाढदिवसानिमित्त वनितावृंदाच्या सभागृहांतच त्यांचा सत्कार करण्यात आला होता. नंतर थोड्याच अवधीत त्यांचे देहावसान झाले तेव्हा अख्खी सोसायटी हळहळली होती. वैनी आणि वनितावृंद म्हणजे एक समीकरणच होते. तेव्हां त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ वनितावृंदाच्या सभागृहांत त्यांची तसबीर लावण्यात आली आहे.

अशा या कर्तबगार व प्रसिद्धी पराङ्मुख वैनीचा २७ फेब्रुवारी २०१९ हा जन्मशताब्दी दिन. त्याप्रसंगी त्यांचे सुपुत्र डॉ. रमेश बाबुराव तेलंग यांनी वृद्ध सेवानिधीसाठी एक लाख एक रुपयांची भेट दिली आहे. विशेष म्हणजे डॉ. तेलंग यांनी त्यांचे वडील श्री. बाबुराव तेलंग यांच्या जन्मशताब्दीच्या प्रसंगी सुद्धा वृद्धसेवा निधीसाठी एक लाख एक रुपयांची भेट दिली होती.

वैनीची अमेरिकास्थित नात सौ. अंबिका तेलंग देसाई (प्रांजल) हिने आजीविषयी लिहिलेला एक हृदयस्पर्शी लेख याच अंकात अन्यत्र छापलेला आहे.

## ई एन् टी तज्ज्ञ डॉ. सुहास वाघ यांजकडून एज्युकेशन सोसायटीला आणखी एक लाख रुपयांची देणगी

माहीम येथे राहणारे ई एन् टी क्षेत्रांतील तज्ज्ञ डॉ. सुहास वाघ यांनी मागे आपले वडील श्री. पांडुरंग (नरहरी) विनायक वाघ यांच्या जन्मशताब्दीप्रसंगी एज्युकेशन सोसायटीला एक लाख रुपयांची देणगी दिली होती. अलीकडेच त्यांनी आपले आईवडील श्रीमती सुंदर व श्री. पांडुरंग वाघ यांच्या स्मरणार्थ आणखी एक लाख रुपयांची देणगी दिली आहे.

## श्री. राजाराम वर्टी यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी एक लाख रुपयांची देणगी

पुण्यांत राहणारे श्री. राजाराम दत्तात्रय वर्टी हे आपल्या ज्ञातीचे एक हितचिंतक होते. त्यांचे ३ फेब्रुवारी २००५ रोजी निधन झाले होते. १५ ऑक्टोबर २०१८ हा त्यांचा जन्मशताब्दी दिन. त्या प्रसंगी त्यांच्या बंगळूर स्थित कन्या सौ. सीमा सुहास फेणे यांनी वडिलांच्या व आई विमल यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ एक लाख रुपयांची देणगी दिली आहे. त्यातील प्रत्येकी पन्नास हजार रुपये वैद्यकीय सेवा निधी व वृद्धसेवानिधीसाठी आहेत.

## श्रीमती मीरा विश्वनाथ तेलंग यांच्या इच्छेनुसार एज्युकेशन सोसायटीला पन्नास हजार रुपयांची देणगी

जोगेश्वरी येथे राहणाऱ्या श्रीमती मीरा विश्वनाथ तेलंग या संघाच्या एक हितचिंतक होत्या. तेथील सरस्वती बागेतील वनिता वृंद या संस्थेच्याही त्या एक सक्रीय कार्यकर्त्या होत्या. त्यांचे दीड वर्षापूर्वी निधन झाले. त्यांच्याच इच्छेनुसार त्यांचे पुत्र श्री. विजय तेलंग यांनी एज्युकेशन सोसायटीला पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे.

## संघास मिळालेल्या देणग्या

| | |
|---|---|
| १. आजी श्रीमती सुधा चंद्रकांत फडणीस यांच्या ८० व्या वाढदिवसा निमित्त नातू श्री. ऋशांत सतेज सबनीस यांजकडून. | १०,००० |
| २. श्री. दिनकर गोविंद बोरकर यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. मिलिंद यांजकडून | १,००१ |
| ३. श्रीमती सुशीला उद्धव दिवाडकर यांच्या जन्मशताब्दी निमित्त नात श्रीमती अश्विनी आशुतोश कोतवाल यांजकडून. | १०,००० |
| ४. श्री. शरद नागेश सलगर यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती रेखा यांजकडून | ५१,००० |
| ५. श्री. कमलाकर यशवंत तेलंग यांच्या १ ल्या पुण्यतिथी निमित्त पत्नी श्रीमती सुरेखा (सुमन) यांजकडून. | ५,००० |
| ६. श्री. शंकर (जयवंत) रामकृष्ण कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ बंधु श्री. शशिकांत यांजकडून. | २५,००० |
| ७. श्री. कृष्णा (अशोक) विनायक गायतोंडे यांच्या विवाहाच्या सुवर्ण जयंती निमित्त | १०,००० |
| ८. श्री. घनश्याम गोपाल वर्टी यांच्या पुण्यतिथी निमित्त कन्या श्रीमती सीमा अजय शेंबेकर यांजकडून. | १,५०० |
| ९. श्रीमती सुनंदा व श्री. गोपीनाथ, श्रीमती गोदावरी व श्रीमती स्नेहलता वाघ श्रीमती सुलभा व श्री. रामकृष्ण शिवराव वाघ यांच्या स्मरणार्थ सर्वश्री अविनाश व सुधीर रामकृष्ण वाघ यांजकडून. | ३,००० |
| १०. श्रीमती रमाबाई व श्री. भिकप्पा विनायक तेलंग, श्रीमती शकुंतला व श्री त्रिंबक महाबळेश्वर तेलंग, श्रीमती सुनंदा व श्री गोपीनाथ शिवराव वाघ, श्रीमती गोदावरी व श्रीमती स्नेहलता वाघ, श्रीमती सुलभा व श्री. रामकृष्ण शिवराव वाघ, यांच्या स्मरणार्थ श्रीमती रमाबाई व श्री. भिकप्पा विनायक तेलंग यांच्या नातवंडाकडून व श्रीमती सुनंदा व श्री. गोपीनाथ शिवराव वाघ यांच्या मुलांकडून. | ५,००० |
| ११. श्रीमती रमाबाई दत्तात्रय नाडकर्णी यांच्या १ ल्या पुण्यतिथी निमित्त पती श्री. दत्तात्रय रामचंद्र नाडकर्णी यांजकडून. | ३,५०० |
| १२. वडील श्री. वसंत मंगेश दुभाषी व आत्या श्रीमती कुसुम मंगेश दुभाषी यांच्या स्मरणार्थ सर्वश्री ऋग्वेदय, पुष्पक व श्रीमती उदिता यांजकडून. | २०,००० |
| १३. श्री. महेश्वर नागेश नाडकर्णी यांच्या जन्मशताब्दी निमित्त कृतज्ञतेच्या भावनेने बंधु श्री. दत्तात्रय नागेश नाडकर्णी यांजकडून. | १०,००० |
| १४. श्रीमती पार्वतीबाई व श्री. गणपत पांडुरंग नाडकर्णी यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ. | ५,००१ |
| १५. श्री. सदानंद गणपत नाडकर्णी यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ. | ५,००१ |

## वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. राजाराम दत्तात्रय वर्टी यांच्या जन्मशताब्दी निमित्त श्रीमती विमल व श्री. राजाराम वर्टी यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती सीमा सुहास फेणे यांजकडून. | ५०,००० |
| २. | श्रीमती रमाबाई दत्तात्रय नाडकर्णी यांच्या १ ल्या पुण्यतिथीनिमित्त पती श्री. दत्तात्रय रामचंद्र नाडकर्णी यांजकडून. | २,००० |
| ३. | श्रीमती पार्वतीबाई व श्री. गणपत पांडुरंग नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ स्मरणार्थ पुत्र श्री. पांडुरंग (आपा) यांजकडून. | ७,५०० |
| ४. | डॉ. सुमती व डॉ. भालचंद्र वामन नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ पुतणी श्रीमती शैला पांडुरंग नाडकर्णी यांजकडून. | ७,५०० |
| ५. | श्री. महाबळेश्वर दत्तात्रय शानभाग यांच्या जन्मशताब्दी निमित्त नात डॉ. मधुरा जयप्रकाश देसाई यांजकडून. | ५,००० |
| ६. | श्री गोविंद मारुती कसबेकर यांच्या ८ व्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री. विनय यांजकडून. | ३,००० |

## वृध्दसेवानिधीसाठी

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. रमाकांत भवानीराव बोरकर यांच्या २२ व्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या मुलांकडून. | १,००१ |
| २. | श्री. राजाराम दत्तात्रय वर्टी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त श्रीमती विमल व श्री. राजाराम वर्टी यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती सीमा सुहास फेणे यांजकडून. | ५०,००० |
| ३. | श्री. त्रिंबक वैकुंठ कसबेकर यांच्या पुण्यतिथी निमित्त नातु श्री. देविदास विश्वंभर कसबेकर यांजकडून. | ११,००० |
| ४. | श्री. शरद नागेश सलगर यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती रेखा यांजकडून. | ५१,००० |
| ५. | श्रीमती रमाबाई बाबुराव नाडकर्णी व सर्वश्री नीलकंठ व सुरेश बाबुराव नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ अनुक्रमे पुत्र व बंधु श्री. मंगेश यांजकडून. | ३०,००० |
| ६. | श्रीमती इंदिरा बाबुराव तेलंग यांच्या जन्मशताब्दीनिमित्त पुत्र डॉ. रमेश यांजकडून. | १,००,००१ |
| ७. | श्री. महाबळेश्वर दामोदर शानभाग यांच्या जन्मशताब्दी निमित्त नातू श्री मंदार जयप्रकाश देसाई यांजकडून. | ५,००० |
| ८. | श्री. माधव रामदास नायक यांच्या वाढदिसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती मानसी अजीथ नायक यांच्याकडून. | २,००० |

## एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | स्नेहसंमेलनानिमित्त डॉ. पद्माकर रामचंद्र दुभाषी यांजकडून. | ५०,००० |

| | | |
|---|---|---|
| २. | श्री. जयवंत श्रीपाद शेटगिरी यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती सीमा यांजकडून. | २५,००० |
| ३. | श्री. शरद नागेश सलगर यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती रेखा यांजकडून. | ५१,००० |
| ४. | श्री. घनश्याम गोपाल वर्टी यांच्या पुण्यतिथी निमित्त कन्या श्रीमती सीमा अजय शेंबेकर यांजकडून. | १,५०० |
| ५. | श्रीमती रमाबाई दत्तात्रय नाडकर्णी यांच्या १ ल्या पुण्यतिथीनिमित्त कन्या श्रीमती वर्षा व जामात श्री. अरविंद देवीदास गायतोंडे यांजकडून. | १,५०० |
| ६. | श्रीमती मीरा विश्वनाथ तेलंग यांच्या स्मरणार्थ त्यांच्याच इच्छेनुसार पुत्र श्री. विजय यांजकडून. | ५०,००० |
| ७. | श्रीमती सुंदर व श्री. पांडुरंग विनायक वाघ यांच्या स्मरणार्थ पुत्र डॉ. सुहास यांजकडून. | १,००,००० |

## ठाणे मंच देणगीदारांची यादी

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. उमेश गुरुप्रसाद वाघ | पुणे | ७,००० |
| २. | श्री. उमेश शंकर तेलंग | पुणे | ५,००० |
| ३. | श्री. सलील श्रीपाद नाडकर्णी | पुणे | ५,००० |
| ४. | श्री. कृष्ण (अशोक) विनायक गायतोंडे | पुणे | ३,००० |
| ५. | श्रीमती पद्मजा रवीन्द्र सुखटणकर | पुणे | १,००० |
| ६. | श्री. संजय यशवंत नाडकर्णी | पुणे | १,००० |
| ७. | श्री. अनंत शिवराव नाडकर्णी | पुणे | १,००० |
| ८. | श्रीमती अरुणा सुभाष बोरकर | पुणे | १,००२ |

## विजूले चुटकुले

घोव : अगो तुका घोव आणि देव हाजे भितरले फरक कळता?

बायल : तांतूत किते कठीण? देवाली पयली 'आरती' जाता. 'सुखकर्ता दु:खकर्ता' मागीर 'प्रसाद' मेळता तर घोवालो पयली 'प्रसाद' मेळता आणि मागीर 'आरती' 'असो कर्ता, तसो कर्ता'

विजय सदानंद वागळे, ठाणे
९२२१६०७५७७

Regd. with registrar of Newspapers of India under Reg. No. RN37436/80




हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक द. ना. नाडकर्णी यांनी
दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.